# चैतन्य लहरी

अंक क्र. ५,६

मे, जून २००३








## अनुक्रमणिका


- रात्रीच्या गर्भात उद्यांचा असे उष:काल ........ २
- विश्व निर्मला प्रेम आश्रम उद्घाटन सोहळा भाषण दिनांक २७ मार्च २००३ ........ ३
- सहस्त्रार पूजा वृत्तांत कबेला २,३,४ मे २००३ ........ ६
- मार्कण्डेय ऋषी ........ ८
- गणपत्यथर्वशीर्ष - अर्थ ........ १०
- अमृतवाणी ........ १२
- सहस्त्रार चक्राविषयी प.पू.श्रीमाताजींनी केलेला उपदेश (संक्षिप्त) ........ १३
- विश्व-निर्मला-धर्म स्थापना ........ १५
- प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा उपदेश, राहुरी, जानेवारी १९८० ........ १६
- भगवान महावीर - परिचय ........ २१
- सहज समाचार ........ २४


चैतन्य लहरी, सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्व्हे नंबर ९८, भुसारी कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०३८
टेलिफोन : ०२०-५२८ ६१०५ chaitanyalaharipune@ rediffmail.com



# ......रात्रीच्या गर्भात उद्यांचा असे उष:काल.....

''माणसा, माणसा कधी व्हशील माणूस'' ह्या संत बहिणाबाईच्या काव्यपंक्ति तीन-चार शतकापूर्वीच्या. त्या काळच्या माणसाची जीवनावस्था पाहून तळमळ व उद्वेग वाटल्यामुळें त्या संत-कवयित्रीला ते काव्य स्फुरले. विज्ञानानें प्राप्त झालेली अनंत सुखसाधने हातात असूनही त्यांच्या विवेकशून्य अतिरेकामुळें सध्याची जगभरांतील माणसांची त्यातूनही झालेली दैन्यावस्था पाहिल्यावर आणखी कांहीं ज्वलंत काव्यपंक्ति एखाद्या कविमनाला स्फुरतील. आपल्या अवतीभोवती रोज घडणाऱ्या घटना पाहिल्या, वाचल्या वा ऐकल्या की कुणाही संवेदनशील मनाच्या माणसाच्या हृदयांत वेदना उमटतील व त्यांतील एखादा ''याजसाठी केला होता अट्टाहास'' या उक्तीपुढे प्रश्नचिन्ह लावेल! परिस्थितीच इतकी गंभीर झाली आहे की असे विचार मनांत आल्यावाचून रहात नाहींत.

पण हाच सृष्टिक्रम आहे. जीवन-मृत्यू, दिवस-रात्र, अंधार-प्रकाश, सुख-दु:ख या जोड्या अनादि कालापासून एकत्रच वावरत आहेत. ऋतुमानाप्रमाणें निसर्गातही हेच कार्य चालू असल्याचे दिसून येते. आपल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या कालांत क्रांतीकारकांनी सहन केलेले सर्व कष्ट, यातना व बलिदान यांतून प्रेरणा मिळालेल्या सृजनशील कवीने ''रात्रीच्या गर्भात उद्यांचा असे उष:काल'' हे स्फूर्तिदायक समर-गीत रचले होते.

आज जगामधें समस्त मानवजातीची जीवनाच्या अवमूल्यांकनाकडे चाललेली घोडदौड पराकोटीच्या ऱ्हासाकडे चालल्याचे न पाहवल्यामुळें आदिशक्तीला अवतरण्यावाचून पर्याय नव्हता. त्यासाठींच प.पू.श्रीमाताजींच्या रुपांत हे अवतरण पृथ्वीवर झाले आहे व जगामधें अवनतीचा काळोख दूर करणारी सहजयोगसूर्याची कल्याणकारक पहाट नव्या सहस्रकांत उगवली आहे. जसजसा हा प्रकाश पसरेल तसतशी या कल्याणकार्याला गति येणार आहे. अर्थात हा प्रकाश आपणा सहजयोग्यांना मिळालेल्या आत्मप्रकाशामधून पसरणार आहे. म्हणून आपण सर्व सहजयोग्यांनी आपल्या हृदयांतील हा प्रकाश उत्तरोत्तर अधिक तेजस्वी बनण्याचा ध्यास घ्यायला हवा व त्याचबरोबर हा प्रकाश वाटण्याचे कार्य अधिकाधिक जोमानें तन-मन-धन अर्पून करायला हवे. त्यासाठीं ध्यान, ध्यास, निष्ठा व कर्तव्यतत्परता या गुणांची पूजा करुन '' सहज ऐका-बोला-पहा-चालवा'' अशी प्रतिज्ञा करुन आपण कार्याला हातभार लावूं या. त्याचबरोबर 'आपण कांहींच करत नाही, सर्व श्रीमाताजीच करत आहेत' ही श्रध्दा हृदयांत बाळगून कार्याला जुंपून घेऊं या.

●●●





# विश्व निर्मल प्रेम आश्रम, दिल्ली

उद्घाटन सोहळ्याचे प.पू.श्रीमाताजींचे भाषण,दिल्ली २७ मार्च २००३

सहजयोगी बनल्यावर तुमच्यामधून फक्त प्रेम व करुणेचा पाझर फुटला पाहिजे. हा आश्रम त्याचाच आविष्कार आहे.

आजकाल आपल्या देशामध्ये जे अनेक प्रश्न आहेत त्यांच्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्याकडे महिला व पुरुष यांच्याबाबत वेगळा दृष्टिकोन हे मुख्य आहे. ह्या भेदभावाचे कारणच समजत नाहीं. आपल्या शास्त्रांमधें तसे कांहींच सांगितलेले नाहीं; उलट ''यत्र नार्या : पूज्यंते रमंत्रे तत्र देवता: '' असेंच शास्त्रामधें म्हटलेले आहे. तरीही आपल्याकडील परिस्थिति पाहिली तर दिसून येते की महिलांबद्दल आदराची भावना अजिबात बाळगली जात नाहीं. उत्तर प्रदेशांत तर मी स्वत: पाहिले आहे की कुटुंबामधें स्त्रीला कांहींच किंमत दिली जात नाहीं.; त्यांना नोकरासारखेच राबवले जाते. हे कां चालत आले व अजूनही चालले आहे याचे खरे कारण म्हणजे लोक अजून जागृत झालेले नाहींत. घराघरातील स्त्रियांचा असा छळ का केला जातो मला समजतच नाहीं. घराबाहेर हाकलून दिलेल्या स्त्रियांकडे कुणी पाहणारही नाहीं; मुले-बाळे बरोबर पण अगदी निराधार अशा अवस्थेंत त्या असतात.

ह्यावर कांही उपाय आहे का, ही परिस्थिति कशी बदलता येईल याच्यावर मी खूप दिवस विचार करत होते; त्याबद्दल लेख लिहून लोकांना समजावण्याचा प्रयत्न केला तरी नुसते वाचून परिस्थिति सुधारणार नाहीं असे वाटते. म्हणून यासाठीं कांही नियोजनपूर्वक व्यवस्थित अशी कांहीं व्यवस्था करणे आवश्यक आहे. रस्त्यावर बसून भीक मागून दिवस कसाबसा ढकलत असलेल्या दुर्दैवी महिलाही मी पाहते. अशा महिलांबद्दल एक अत्यंत उदासीन अशी प्रवृत्ति आपल्या समाजांत दिसून येते.अशा दुर्दैवी अनेक महिलांना मी प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी बोलल्यावरही त्यांना दिल्या जणाऱ्या अशा वागणुकीचे कारण मला दिसले नव्हते. म्हणून मी अशा महिलांसाठीं त्यांच्या निवासाची व उदरभरणाची कांही निश्चित व्यवस्था करण्याचा ठाम निर्णय घेतला होता.

खरे तर स्त्री हाच मानवजातीचा आधारस्तंभ आहे, तिच्यामुळेंच सारा संसार चालत आला आहे. पण त्यांनाच या वेड लागेल अशा परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. आणि पदरात मुले असल्याने धीर व आशेच्या जोरावर त्या कसेबसे दिवस काढत आहेत. पैसे मिळवण्याचे काहीच साधन नसल्यामुळें दुसरे कांहीच करण्यासारखी त्यांची स्थिति नाही. मग त्या कुठें जाणार व काय करणार? म्हणून अशा निराधार व बेजार महिलांसाठी एक आश्रम उभा करण्याचे मी ठरवले. या ठिकाणीं त्यांना आश्रय मिळेल, कांही शिक्षण घेतां येईल; छोटे-मोठे व्यवसाय शिकता येईल व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची हिम्मत मिळेल. त्याबरोबरच त्यांना प्रेम मिळेल. त्यांचा कांहीही दोष नसतांना भीक मागत कसेबसे जीवन जगणाऱ्या या असहाय्य महिलांना असा आधार देणें हे सामाजिक कर्तव्यच आहे. ह्या आश्रमाचे काम सुरु झाल्यावर लवकरांत लवकर ते पूर्ण व्हावे अशी माझी इच्छा होती. आतां ते पूर्ण झाले आहे.



या इमारतींचा पांढरा रंग खराब होणार नाहीं अशा खास तऱ्हेने तो बनवला आहे. हा रंग बनवण्याची पध्दत मी इटलीमधे पाहिली व त्याच खास पध्दतीने तो बनवला आहे. तो किती सुंदर दिसत आहे हे तुम्ही पहातच आहात. पाणी, धूळ वगैरे कशानेही तो खराब होणार नाहीं. आपल्या देशात अशी प्रयोगशीलता कमी आहे. पण असा रंग बनवणे कांहीं अवघड नाहीं. मी बऱ्याच लोकांना तो तयार करण्याचे सांगून पाहिले पण कोणी तयार होत नव्हता. जे चालत आले आहे तसेच पुढेही चालवत ठेवण्याची प्रथाच आपल्या लोकांच्या अंगवळणी पडली आहे. आपल्याकडे इतके ज्ञान आहे, मोठमोठे विद्वान-पंडित होऊन गेले पण लोकांना त्याची कांहीच माहिती व किंमत नाहीं. आपण किती महान देशांत जन्माला आलो आहोत याची पण जाण नाहीं. त्याचमुळें स्त्रीची किंमत लोकांना कळत नाहीं; त्यांना अगदी क्षुद्र समजून वाईट वागणूक दिली जाते. नवरे-मंडळी भले दारु पितील पण बायकोला कांहींच सवलती-सोय देणार नाहीं; बायकोच्या घरुन पैसा मिळाला नाहीं तर बिचाऱ्यांना फार त्रास भोगावा लागतो. मग अशा बायका घरींच रडत बसतात नाहीं तर बाहेर पडून खुशाल भीक मागतात. विशेष करुन उत्तर प्रदेशांत या गंभीर प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले गेले नाहीं. महाराष्ट्रात बरेच समाजसुधारक झाले व त्यांनी खूप चांगले कार्य केले; महिलांसाठी शिक्षणाची सोय झालीं, मुलींची विद्यापीठे निघाली आणि लोकांना महिलांचे गुण लक्षात आले.

तुम्हा लोकांना हीच विनंती आहे की परिस्थिति नीट पाहून आपण काय करु शकतो, शिक्षणक्षेत्रात काय कार्य करावे अशा विषयांबद्दल आम्हाला सूचना करा. वर सांगितलेल्या लाचार महिलांसाठी खास करुन काय करता येईल याचा पण विचार करुन आम्हाला जरुर कळवा. परदेशांत महिलांच्याबाबतीत कायदे कडक असल्यामुळें त्यांचा असा छळ होत नाहीं, त्यांच्या बाबतीत परिस्थिति आपल्या पेक्षा खूप चांगली आहे. आपल्याकडे मात्र उलटी परिस्थिति आहे. मी परदेशांत खूप ठिकाणीं हिंडले आहे व मला हा फरक फार जाणवतो. मुळांतच भारतीय स्त्रीमधें कुटुंबाचे पालन पोषण, दक्षता, मेहनत व प्रेमळ मातृत्वाचे गुण आहेत. पण पुरुष वर्गाकडूनच प्रेम-आदराच्या अभावी त्यांची हेळसांड केली जाते. आता इथल्या महिलाही जागरुक होऊन, संघटित होऊन ही परिस्थिति सुधारण्याची धडपड करत आहेत. पण त्यांच्या प्रयत्नांना म्हणावी तशी दाद मिळत नाहीं.

या सर्वांवर उपाय म्हणून आम्ही हा आश्रम बनवला आहे. या आश्रमांत ज्या महिला वा मुली येतील त्यांना आपल्या पायावर उभे राहण्याचे ज्ञान दिले जाईल; त्याचबरोबर त्यांना सहजयोगही मिळेलच. त्यांनी सहजयोग आत्मसात केला तर अभिमान व गौरवपूर्वक जीवनही त्यांना प्राप्त होईल. इथें अनेक कला, पाककला व इतर उच्च दर्जाचे शिक्षण देण्याची व्यवस्था करता येईल. त्या दृष्टीने इथें येणाऱ्या महिलांची क्षमता व तयारी लक्षांत घेतली जाईल. आपल्याला त्यांना नुसते कामाला न जुंपता त्यांना मदत करावी लागेल, त्यांच्यावर लक्ष द्यावे लागेल. समाजाला आजकाल जी अनिष्ट व हानीकारक कीड लागली आहे ती दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न आपल्याला करायचा आहे. तसेच महिलांबद्दल आपल्या हृदयात श्रध्दा आली पाहिजे; त्याच्या अभावामुळेंच माणसे बायकांना त्रास देत राहतात व मारपीटही करतात. माझ्या माहितीमधे अशा दुर्दैवी महिलांच्या इतक्या करुण कहाण्या आहेत की त्या सांगत बसले तर तुम्हालाही रडूं येईल. मी पण त्या ऐकून खूप रडले आहे व म्हणूनच मी हा मार्ग निवडला आहे. सुरवातीला हा लहानसा प्रयत्न आहे पण काहीं काळानंतर तो वाढणार आहे; इथें आलेल्या महिला ठीक होऊनच बाहेर पडणार आहेत; स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःला व स्वतःच्या मुलाबाळांना त्या नीट सांभाळतील व जीवनांत स्वाभिमानपूर्वक यश संपादन करतील; हे करण्याची आजकाल अत्यंत आवश्यकता आहे. त्या अभागी असल्या तरी मानव आहेत व मानवजन्माचा गौरव त्यांना मिळवून देण्याचे हे कार्य आहे. तुम्ही लोकांनीही आपापल्या कुटुंबियांकडे याच दृष्टिकोनातून पहा व आपलेही कांही चुकत नाहीं ना हे तपासून पहा.

मी मुद्दामहून परदेशी योगी असूनही हिंदीत बोलत आहे, कारण त्यांच्यासमोर आपल्याच देशातील लोकांची निंदा करण्यात संकोच वाटतो. त्यांना आपापल्या देशाचा अभिमान आहेच, पण तरीहि इथें आले की इथल्या जमिनीला डोके लावून भूमातेचा आदर करतात. ही त्यांचीच इच्छा व श्रध्दा आहे. मी सांगितले



म्हणून असे करतात असे मुळीच नाही, म्हणून आपल्याकडील महिलांची दुर्दशा मी त्यांच्या समोर सांगत नाही.पण आपल्या समाजातील ही कीड आपणच दूर केली पाहिजे; व आपल्या महिला भगिनींचा मान आपण राखला पाहिजे; त्यांच्याबद्दल श्रध्दा ठेवली पाहिजे. म्हणजे त्यांची गुलामगिरीतून सूटका होईल. तसे केले नाहीं तर त्या महिलांना भोगावा लागणारा छळवाद पुरुषांनाही शाप देईल. ही परिस्थिति सुधारली तर आताची मुलेही सुधारतील.

ह्या आश्रमाची ही वास्तू उभी राहिल्याचे बघून मला फार आनंद होत आहे. इथें येणाऱ्या महिलांनाही आधार, प्रेम व आदरच मिळणार आहे. या कार्यामुळें आपला देशही अत्यंत उन्नत होणार आहे. या आश्रमाच्या कार्याबद्दल मला खूप आशा आहेत. ज्या परिस्थितीबद्दल मी इतकी वर्षे खंत बाळगून होते ती बदलण्याचा हा प्रयत्न आहे. सहजयोगात येऊन तुम्ही आत्मा जाणला आहे व आता सर्वांबद्दल, सर्व बाबतीत तुमची दृष्टि करुणामय झाली पाहिजे. मग अशा पीडित व दुर्दैवी महिलांना मदत करण्यांत तुम्हाला धन्यता वाटेल. हा छोटासा प्रयत्न असला तरी मी तुम्हा सर्वांना विनंती करते की माझ्यावर जसे प्रेम करता तसेच प्रेम आपल्या माता-भगिनींवर करा.

सर्वांना अनंत आशीर्वाद.







# सहस्रार पूजा वृत्तांत

कबेला, दि.२,३ व ४ मे २००३

प.पू. श्रीमाताजींच्या निराकार उपस्थितीमधून सहजयोग्यांना चैतन्याचा अनुभव मिळाला.

दि. २ मे रोजी दुपारनंतर जगातील जवळ जवळ ८० देशातील सहजयोगी कबेला येथील सहस्रार पूजेसाठी जमू लागले व नदीकाठी असलेल्या मंडपामधील वातावरण गजबजू लागले. एकमेकांचे स्वागत व गाठीभेटीतील आनंद यामुळे वातावरण अधिकच प्रफुल्लित होत गेले. सायं. ७ वा. हवनाचा कार्यक्रम झाला. सर्व सहजयोग्यांच्या उपस्थितीने व हवनाने वातावरण चैतन्यमय व अधिकाधिक शुध्द होत गेले. त्यानंतर सामूहिक ध्यान व नंतर रात्रीचे भोजन घेऊन सर्व सहजयोगी विश्रांतीसाठी विसावले.

दि. ३ मे रोजी सकाळचे ध्यान ८ वा सुरु झाले. दुसरीकडे आणखी सहजयोग्यांचे आगमन होत होते. ध्यानानंतर आलेल्या सहजयोग्यांचे रजिस्ट्रेशन चालू होते.त्यावेळी एकमेकांना आलिंगन देत नवीन योग्यांचे स्वागत होत होते व भेटीचा आनंद लुटत होते. स्वच्छ सूर्यप्रकाशामुळे वातावरणात थोडी उष्णता जाणवत होती. काही योगी चालत व काही मोटारीने कबेल्यातील छोट्या शहराकडे धावले. शहरातील सर्व हॉटेल्स, दुकाने इ. ठिकाणी सहजयोग्यांनी गर्दी केली. कॉफी,आईसक्रिमचा आस्वाद घेत एकमेंकांशी वार्तालाप करण्यात सर्वजण मग्न झाले होते. दुपारच्या भोजनानंतर सर्वांनी विश्रांति घेतली. संध्याकाळी ५ च्या सुमारास सामूहिक जोडेपट्टीचा कार्यक्रम झाला. सर्व सहजयोगी मंडपात जमले त्यावेळी जाहीर करण्यात आले की '' आजच्या संध्याकाळी होणाऱ्या कार्यक्रमासाठी श्रीमाताजी सगुणरुपात उपस्थित असणार नाहीत आपण त्यांचे परमचैतन्य आपल्यात आधिकाधिक ओढले पाहिजे याची सर्वांनी जाणीव ठेवावी अशी ही वेळ आहे. तसेच त्यांच्याकडून कसल्याही अपेक्षा करु नका. निरासक्ततेत राहून एकमेकांना प्रेम द्या त्यामुळे तुमची आत्मशक्ति वाढेल व आनंद मिळेल.''

नंतर संध्याकाळच्या कार्यक्रमाच्या सुरवातीला श्रीमाताजीवरील जीवनपटावर आधारित एक चित्रफीत दाखविण्यात आली. त्यामधे श्रीमाताजी किनाऱ्यावर असताना सागरातून गुलाबी तांबूस रंगातील कुण्डलिनीचे उत्थापन दर्शन - दृष्य, या चित्रफीतीत दाखविले गेले.

यानंतर ऑस्ट्रियन लोकांनी पडद्यावर चित्रफीतीतील दृष्यांचा उपयोग करुन काही काव्यगाणी सादर करीत एक सुंदर नाटिका सादर केली. त्यामध्ये चक्रांवरील देवता, त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रुपात व वेषात स्टेजवर अवतरल्या. त्याच वेळी मागच्या चित्रफितीत काही सहजयोग्यांनी घेतलेल्या जागृतीचा प्रसंग, श्रीमाताजींनी वापरलेल्या वस्तु, साड्या, हातरुमाल, मेकपबॉक्स, चष्मा इ . वस्तु दाखविल्या. तसेच अमेरिका, इग्लंड, इटलीतील श्रीमाताजी व सहजयोग्यांचे आगमन व सहजयोगाचा विस्तार इ. दृष्ये आकर्षक रितीने चित्रीत केली होती. कुंडलिनीचे उत्थापनाचे दृष्य व नंतर श्रीमाताजींच्या ध्यानाच्या प्रसंगाने या नाटकाचा शेवट झाला. यानंतर सहजयोग्यांच्या भजनांचा, गाण्यांचा कार्यक्रम सुरु झाला. त्यावेळी सहजयोगी आणि योगिनींनी आपल्या आवेषपूर्ण नृत्याने रंगत वाढविली. त्यामुळे पहाटेचे ४.०० कधी वाजले ते कोणाच्या



लक्षातच आले नाही. त्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

दि. ४ मे रविवारच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळच्या सामूहिक ध्यानाने झाली. पूजेसाठी उपस्थित राहण्यासाठी नवीन सहजयोग्यांचे आगमन चालूच होते. काही सहजयोगी जवळील नदीवर स्नानासाठी व जोडेपट्टी करण्यासाठी गेले होते. लहान मुले नदीकाठी खेळण्यात रमली होती. ऊन होते तरी हवेत चांगलाच गारवा जाणवत होता. सायंकाळी ६ च्या सुमारास सर्व सहजयोगी मुख्य मंडपात ध्यानासाठी जमली व सर्वांना ध्यानात बसण्यास सांगण्यात आले. पूजेची वेळ ८ वा असल्याने तोपर्यंत सर्वांनी ध्यान केले. बरोबर ८ वा. पडद्यावर चित्रफित दाखविण्यास सुरवात केली.ती गेल्यावर्षीची सहस्त्रारपूजेची होती. चित्रफीत संपल्यानंतर काही मिनीटातच घोषणा झाली की ' श्रीमाताजींच्या अनुपस्थितीत पूजा अशीच पुढे चालू राहील, त्या निराकार रुपात आपल्याबरोबर असून त्यांच्या चैतन्यलहरी आपण जास्तीत जास्त घेतल्या पाहिजेत 'थोडावेळ गंभीर शांतता. पण लगेच सर्वांना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव होऊन पूजा पुढे चालू झाली. त्यामध्ये प्रचंड वाढलेल्या चैतन्यलहरी ह्या श्रीमाताजींच्या निराकार आस्तित्वाची सर्वांना ग्वाही देत होत्या. त्याचप्रमाणे श्रीमाताजींचे प्रेम, पूजेतुन लाभणारा आनंदाने वातावरण अधिकच चैतन्यमय झाले होते.

पूजेनंतरच्या चैतन्यमय वातावरणात सर्व सहजयोगी नाच -गाण्यात, भजनांत दंग झाली त्यामध्ये मध्यरात्र उलटून गेली. त्यानंतर सर्वांनी एकत्र शांतपणे रांगेत उभे राहून पूजेचा महाप्रसाद घेतला. त्यावेळी सर्वजण एकमेकांची विचारपूस, ख्याली खुशालीची चौकशी करत होते. सर्वांचा महाप्रसाद घेऊन झाला त्यावेळी पहाटेच ५ वाजले होते. सर्वजण आपापल्या वाहनाने मिळालेल्या प्रचंड चैतन्यलहरींच्या आनंदात परतीच्या प्रवासास लागले.

(इ. मेल वृतांत )

●●●





# मार्कण्डेय ऋषी

(मार्कण्डेय ऋषींचा आदिशक्ति व कुण्डलिनीच्या संदर्भात श्रीमाताजींनी अनेक वेळा उल्लेख केला आहे. व्हिऐन्रा येथील सहज-आश्रमामधे ९ जून १९८८ रोजी श्रीमाताजींनी सांगितलेल्या माहितीचा संक्षिप्त सारांश)

तुम्हाला मार्कण्डेय ऋषींची माहिती मी आज सांगणार आहे. मार्कण्डेयांच्या जन्माआधी त्यांच्या माता-पित्यांना संतान नव्हते; मूलबाळ नसल्यामुळे ती दोघेजण दु:खी होते. त्यासाठीं त्यांनी श्रीशिवांची तपश्चर्यापूर्वक आराधना केली. श्री शिव प्रसन्न झाल्यावर दोघांनी त्यांच्याकडे पुत्रप्राप्तीसाठी वर मागितला. शिवांनी होकार दिला पण त्याचबरोबर ते म्हणाले ''तुम्हाल पुत्रप्राप्ति होईल पण हा पुत्र आठ वर्षाचा झाल्यावर मी त्याला परत नेईन, अर्थात त्याला आठ वर्षाचेच आयुष्य लाभेल.'' बिचाऱ्या मातापित्यांना पुत्रप्राप्तीच्या लाभाबरोबरच हा एक प्रकारचा शाप असल्यासारखे वाटले आणि दोघेही खिन्न झाले. यथावकाश मार्कण्डेयांचा जन्म झाला आणि त्याची प्रगति, बुध्दिमत्तेचे तेज, धार्मिक व अध्यात्मिकतेची अलौकिक, जाण पाहून दोघेजण प्रसन्न झाले.

आई-वडिलांच्या मनांतील खिन्नता अर्थातच लपून रहात नव्हती. चाणाक्ष मार्कण्डेयांच्या हे लक्षांत आले व त्याचे कारण विचारल्यावर वडिल म्हणाले ''तुझ्यासारखा तेजस्वी पुत्र आम्हाला शिवकृपेने लाभला; पण तुला आठ वर्षाचेच आयुष्य असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. तुझ्या सहवासाला आम्ही लवकरच मुकणार; शिवांची भविष्यवाणी कशी व कोण बदलू शकेल? आमच्या पोटी तूं आलास; आजपर्यंत आम्हाला इतका लळा लावलास पण आता त्या येणाऱ्या विरहाच्या कल्पनेनेच आम्ही खिन्न आहोत''

बुध्दिमान मार्कण्डेय तात्काल म्हणाला ''काळजी करु नका मी आदिशक्तीलाओळखतो; मी तिलाच विचारुन येतो ''असे म्हणून मार्कण्डेय दूर पर्वतावर गेला-ज्याला तुम्ही आज सप्तशृंगी म्हणता- आणि आदिशाक्तीची प्रार्थना करु लागला. तोपर्यंत आदिशक्तीची प्रार्थना कोणी करत नसे; जगदंबा इ. देवींची लोक प्रार्थना-आरती करत; आदिशक्ति साक्षात् परमेश्वरच म्हणून तिचीच प्रार्थना मार्कण्डेयांनी केली आणि ती त्यांच्यासमोर प्रगट झाली. त्यांना झालेले तिचे दर्शन तंतोतंत माझ्याच चेहऱ्यासारखे होते; शृंग म्हणजे शिखर. माझ्या मस्तकावर सात चक्रे त्यांना दिसली; म्हणूनच त्याला सप्तशृंग नांव पडले. पृथ्वीमातेमधून प्रगट झालेल्या माझ्या समोर त्यांनी प्रार्थना केली आणि सर्व परिसर चैतन्याने इतका भारुन गेला की शिवसुध्दा त्यांना स्पर्श करु शकले नाहींत.

हेच सर्व वर्णन मार्कण्डेयांनी लिहून ठेवले आहे; त्यांच्या आधीं कुणीही आदिशक्तीबद्दल लिहीलेले नाहीं. शंकराचार्यांनीही तेच वर्णन केले आहे. आदिशक्ति आणि आत्मसाक्षात्कार याबद्दलही सर्वप्रथम लिहून ठेवले ते मार्कण्डेयांनीच. सात शिखरांपैकी या दोन शिखरांमधे अंतर आहे व एका डोंगरावरुन बैलगाडी मधल्या पोकळीमधून अधांतरी चालल्यासारखी

दुसऱ्या डोंगरावर जायची अशी गोष्ट सांगितली जात असे. आता या स्थानापर्यंत पोहचण्यासाठीं रस्ता झाला आहे. आदिशक्ति हे परमेश्वराचे पूर्ण रुप आहे; तुळजापूरची महाकाली, कोल्हापूरची महालक्ष्मी व माहूरची महासरस्वती अशी तीन पीठे महाराष्ट्रांत आहेत, व हे स्थान अर्धमात्रा असल्याने ते पूर्ण रुप आहे. मार्कण्डेयांसाठी आदिशक्ति पूर्ण रुपांत प्रगट झाली. कारण ते तिचे सर्वांत लाडके पुत्र होते. म्हणूनच ते माझे इतके इत्थंभूत वर्णन करु शकले. याआधी आदिशक्ति पूर्णरुपांत कुठेंच प्रगटली नव्हती. फार पूर्वी वैकुंठामधील गोकुळांत (भारतातील गोकुळ नव्हे) तिने गाईचे रुप धारण केले होते व सर्व देव-देवतांना आपल्यामधें धारण केले होते. पण मार्कण्डेयांना तिचे दर्शन झाल्यावर त्यांनी भविष्यकाळांत पृथ्वीवरच्या अवतरण स्वरुपाविषयीं लिहून ठेवलेले वर्णन माझ्याशी तंतोतंत जुळते. त्यामुळेंच भारत देश ही एक महान पुण्यभूमी म्हणून ओळखली जाते. पण संत आणि सामान्य लोक यांच्यातील फरक हाच की लोक संतपुरुषाला नीट ओळखूं शकत नाहींत. सप्तशृंगी हे एक महान तीर्थस्थान आहे एवढेच ते समजतात.

मार्कण्डेय हे असे महान ऋषी होते; त्यांनीच नंतर बुध्द, आदि-शंकराचार्य म्हणून जन्म घेतले. सुरवातीला श्रीरामपुत्र लव म्हणून ते आले, लव नंतर रशियामधें गेला होता. म्हणून रशियन नावांत 'स्लाव्ह' हा शब्द आला. कुशही चीनमधें गेला म्हणून त्या लोकांना 'कुशान' असे म्हणत. त्यांनी पुन्हा नंतर हसन आणि हुसेन असे रुप धारण केले. मार्कण्डेय हे नावच अलौकिक आहे; मार्कण्डेय म्हणजे तेजस्वी शक्ति. तसेच सूर्यालाही मार्कण्डेय हे एक नाव आहे.



## ॥ श्री गणपत्यथर्वशीर्ष ॥



अथर्वशीर्ष अथर्ववेदाचाच भाग मानला जातो. अथर्वशीर्षाच्या शेवटी 'इत्युपनिजबद्' या शब्दांवरुनही हे एक उपनिषद असल्याचे जाणवते. उपनिषदांचा मुख्य विषय 'बह्मज्ञान' असल्यामुळें गणपतीचे परब्रह्नस्वरुपच अथर्वशीर्षामधे विशद केल्याचे दिसून येते. अर्थात परमब्रह्माची सर्व गुणवैशिष्टये गणपतीकडे ओघानें येतातच.

### प्रारंभ

**मंत्र :-** ''ओम नमस्ते गणपतये ।''

**अर्थ :-** '' ओम् । गणपतीला माझा नमस्कार असो''

**भावार्थ :-** भारतातील संस्कृतीमधे 'ओम्' उचारुन यज्ञ-दान-तप साधनेची सुरुवात करण्याची परंपरा आहे. 'ओम् ' या शब्दानें एकमेव व अद्वितीय अशा परबह्मत्त्वाला संबोधले जाते. 'नमस्ते' हा शब्द समर्पण भाव दर्शवणारा आहे; कारण 'नमस्' हा शब्द ' न मम' या संज्ञेच्या अपभ्रंशातून आलेला आहे. अर्थात पूर्ण समर्पित भावनेने उचारलेल्या 'नमस्ते' शब्दामधें खोल अर्थ दडलेला आहे. गणपति या शब्दामधील 'गण' हा शब्द 'गण् ' या मूळ धातूपासून आला. 'गण ' म्हणजे मोजणे; या धातूपासून 'गण्य'= मोजता येण्यासारखे व 'अगण्य'= मोजता न येण्यासारखे, हे शब्द होतात. गणपति परबह्मस्वरुप असल्याने अगण्य आहे; पण मानवाच्या सामान्य व स्थूल बुध्दीला आकलन होण्यासाठीं ज्याची गणति होऊं शकेल अशा चराचरांच्या समुच वस्तूमात्रांचा स्वामी या अर्थानि 'गणपति' हा शब्द रुढ झाला. तरीही चिंतनशील साधकाच्या हृदयांत 'गणपती' केवळ नामरुपात्मक स्थूल सृष्टि बरोबरच सर्व सूक्ष्मसृष्टीचाही तोच स्वामी म्हणजे पति आहे हाच भाव





येतो. म्हणून गणपतीला वंदन करुन अथर्वणऋषी ग्रंथाची सुरवात करतात. गणपतीच्या ओंकारस्वरुपामुळेंच ज्ञानेश्वरीची सुरवात 'ओम् नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या । देवा तूंचि गणेशू ' या नमनानें ज्ञानदेव करतात. संत तुकारामही 'ओंकार प्रधान रुप गणेशांचे ' असे म्हणून 'तुका म्हणे ऐशी आहे वेदवाणी' असेच सांगतात.

मंत्र :- '' त्वमेव प्रप्त्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि ।
त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि ।
त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यम् ॥ १ ॥
ऋतं वंच्मि । सत्यं वच्मि ॥२ ॥

अर्थ :- १) 'तत्त्वमसि' या महावाक्याने निर्देशिलेले ब्रह्मतत्त्व तुझ्या रुपातच सामावले आहे. तूंच एकमेव कर्ता आहेस, (सृष्टीचा)निर्माता व पोशिंदा आहेस, तूच एकमेव संहार करणारा आहेस. 'सर्व खाल्विदं ब्रह्म' या शब्दांनी श्रुतीने परिपादिलेले सर्व व्यापक ब्रह्मही तूच आहेस.

२) मी ऋत व सत्य आहे तेच बोलत आहे.

भावार्थ :- 'तत् त्वम असि' या वेदान्तातील महावाक्यानें (महान अर्थाचे वाक्य) निर्देश करतात तेच गणपतीच्या रुपाने दृष्टिगोचर झाले आहे असा पहिल्या उपमंत्राचा - त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि- भावार्थ आहे.

परब्रह्माची सत्ता सर्वव्यापी असल्यामुळें व श्रीगणेश साक्षात परब्रह्मरुप असल्यामुळें ' 'कर्ता, धर्ता व हर्ता' अर्थात जन्म देणें, पालनपोषण करणें व संहार करणें ही कर्मेही त्यांच्याकडे ओघाने आलीच. तरीही 'त्वमेव केवलं कर्तासि' या उपमंत्रावर चिंतन करता-करताच साधकाचा अहंकार आपोआप गळून पडलां पाहिजे हा भावार्थ महत्त्वाचा आहे. कर्तृत्वातील 'मी' पणा सोडणे ही साधना मोलाची आहे. सृष्टीमधील जनन- पोषण- संहार ही प्रक्रिया जीवाच्या उन्नतिमार्गावरील विकासासाठींच आहे हा भावही त्यांतून लक्षात येतो.

'सर्व इदं' हा वाक्प्रकार श्रुतींमधें अनेक ठिकाणीं आढळतो. 'इदं' म्हणजे 'हें' ; व्यवहारांत माणसाची ' हे माझे, हे माझे ...... 'ही लांबण संपतच नाहीं; त्याला अंत आहे हे समजूनही ती थांबत नाहीं. पण परब्रह्म सर्वव्यापी असल्यामुळें गोचर' अगोचर सर्व कांहीं त्याचेच आहे; त्यांत कांहीं येत नाहीं असे नाहींच. सृष्टीमधें जे जे कांही निर्माण होते तो परब्रह्माच्या ठिकाणी दिसणारा नुसता भासमान देखावा आहे हाच वेदान्ताचा सिध्दांत इथें दाखवला आहे. हे शब्द गणपतीला- तो परब्रह्मस्वरुप म्हणून - उद्देशून असल्यामुळें शेवटी 'ब्रह्मासि' हे शब्द आहेत. तेव्हां 'तूं परब्रह्मच आहेस, अर्थात हे सर्व खरोखर(खलु)तूच आहेस' हा या उपमंत्राचा भावार्थ आहे. ह्या सर्व भावाचा अर्थ ठसवण्यासाठीं गणपति ब्रह्मस्वरुप म्हणून त्याच्या रुपामधें आत्म्यैक्यच आहे असा 'त्वं साक्षात् आत्मासि' या उपमंत्राने समारोप केला आहे.

वरील आशयाची सुसंगता स्पष्ट करण्यासाठीं 'ऋतं' वच्मि । सत्यं वच्मि ।' हा उपमंत्र अथर्वणऋषी वापरतात; आपले म्हणणे सत्य व श्रुतीस धरुन आहे हा त्यांचा संदेश आहे. वर उल्लेखलेले ज्ञानेश्वर - तुकारामांचे शब्दही हेच दर्शवतात.

(क्रमशः)



# अमृत वाणी

## अहंकार

आपल्या प्रवचनांमधे प.पू.श्रीमाताजींनी अहंकारा बद्दल वारंवार उपदेश केला आहे. व सहजयोग्यांनी अहंकारावर नियंत्रण करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या प्रवचनांमधील त्या संबंधातील कांहीं मौक्तिक वचने :-

<u>प्रवचन :-ऑगस्ट १९७९</u>

- मनुष्याचे स्वत:शी इतके तादात्म्य आहे की त्याला स्वत:चे दोष समजून घ्यायचेच नसतात. स्वत:च्या दोषांचे ओझे जन्मोजन्मी वाहण्यापेक्षा ते समजून घेऊन काढून टाकणें हे केव्हाही उत्तम.
- आपल्यावर अहंकाराचे आवरण असेपर्यंत आत्म्याचे दर्शन होणार नाहीं. या अहंकाराशी लढाई करुन कांहीं फायदा होणार नाहीं. सहजयोगामधें अहंकाराशी लढायचे नसते; त्याला समजून घ्यायचे असते.
- जागरुक चित्तानें अहंकाराकडे बघताच तो थंड होतो कारण आपले बघणें प्रकाशमय असते; त्या प्रकाशांत आपल्या अहंकाराचे खेळ आपण बघतो आणि हसतो.
- मानवी बुध्दि आणि तिची चाल कशी असते हे समजणें अवघड असतें . जे सत्य उघड दिसत आहे त्याचा माणूस स्वीकार करत नाहीं आणि जे दृष्टीस पडत नाहीं ते मानतो. याला कारण माणसामधील अहंकार.
- अहंकार माणसाला गाढव बनवतो. गाढवालासुध्दा काही अकल असते. पण माणसाला अहंकार झाला तर त्याच्यासारखे गाढव सुध्दां वागत नाहीं. मनुष्य आणि त्याचा अहंकार यांची बेरीज म्हणजे गाढवच.
- अहंकारामुळें माणूस आपले स्वातंत्र गमावून बसतो आणि दिवस छ रात्र जाळ्यांत वा आपल्याच कोषात अडकून बसतो; स्वत:ला फार मोठा समजूं लागतो. त्याला त्याचा खरा रस्ता समजत नाहीं आणि कुठे चाललो आहोंत हेहि समजत नाहीं.

<u>सरस्वती पूजा :- जानेवारी १९८३</u>

- अहंकार हा केवळ असत्य आहे; म्हणून तुम्हाला वाटूं लागते की तुम्हीच प्रत्येक गोष्ट करत आहांत. वास्तविक तुम्ही कांहींच करत नाहीं. तसे वाटणे हा मूर्खपणाच.
- स्वत:बद्दल बोलणें फार वाईट. स्वत:बद्दल बढाया मारायला लागलात की हा अहंकार तुम्हांला सर्व बाजूने घेरेल आणि त्याच्या भिंती वाढल्यानंतर इतक्या जाड होतील की त्यांचा भेद करणें अशक्य होईल.
- कोणीही कसलीही बढाई मारुं नये किंवा स्वत:चे मोठेपण दाखवण्याचा प्रयत्न करुं नये.
- बोलताना 'मी' ऐवजी 'आम्ही' या शब्दाची भाषा वापरा. त्यातून बोलणे आत्मलक्षी न होता संपूर्ण सहजयोग्यांचे एक सामूहिक जिवंत व्यक्तिमत्त्व (Organism) दिसून येईल.

<u>बुध्द पूजा : ऑगस्ट १९८१</u>

- बुध्दाचा एक संदेश 'अहंकार वाढू देऊ नका' असा होता. कांहीही करत असतांना 'हे मी करत नाही' असाच भाव व श्रध्दा ठेवा. 'सहजयोगासाठीं मी अमुक अमुक करतो' ही भाषाही करुं नका.
- सामूहिकतेमधील तुमची उपस्थिति इतरांना आनंददायी कसे होईल इकडेच लक्ष ठेवा.





# सहस्रार चक्र

सहस्रार चक्रांविषयी प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींनी वेळोवेळी केलेला उपदेश (सारांश)

दि. ५ मे १९७० हा शुभ दिवस आपल्या सर्व सहजयोग्यांना, जिज्ञासूवृत्तीच्या साधकांना अधिकाधिक महत्त्वपूर्ण आहे. कारण या दिवशी अंतिम महान ईश्वरी कार्य म्हणजेच परम आदिशक्तीचे अंतिम चक्र (सहस्रार) उघडण्याची घटना घटित झाली. साऱ्या विश्वातल्या सर्व अध्यात्मिक घटनांमध्ये ही घटना सर्वांत महान आहे. ते (सत्य) अत्यंत सावधपणाने आणि तारतम्य सांभाळून संपन्न केले आहे. परमेश्वरी साम्राज्यात गोष्टी कशा घटित होतात हे मानवाच्या आकलन शक्तीच्या मर्यादेत बसणारे नाही. हे आपल्या लोकांचे सुभाग्य आणि ईश्वरी प्रेम की ज्यामुळे हा आश्चर्यचकित करणारा चमत्कार घडला. ही घटना घडल्याशिवाय लोकांना सामूहिकरीत्या जागृति देणे असंभव होते.

सहस्रारामधे सात प्रमुख चक्रांची पीठे अस्तित्वात आहेत. मानवी शरीरात एक हजार नाड्या आहेत. त्यांना ज्योती म्हणतात. त्या सर्वांना प्रत्येकी सोळा हजार शक्ति आहेत. प्रत्येक नाडी विशिष्ठ प्रकृतीच्या मनुष्याबरोबर व्यवहार करत असते. या सर्व नाड्यांच्या परिवर्तितेमुळे आणि एकसुत्रतेमुळे मानवी जिवांची काळजी घेतली जाते.

सहजयोग जे पवित्र आत्मे आहेत त्या लोकांसाठी आहे. इतर सर्व चुकीच्या गोष्टी; समजुती , टाकल्या पाहिजेत. सहस्रार हे नियंत्रित मार्गदर्शक व उत्क्रांतीची शक्ती आहे. म्हणून ते विकसित होण्यासाठी आणि संवर्धित होण्यासाठी प्रत्येकाने स्वत:ची प्रगति तपासली पाहिजे. चुकीच्या गोष्टीचे समर्थन करु नका. समर्थन करता म्हणजे तुम्ही त्याचा विचार करता. आपल्याला त्याचा विचार करायला वेळ नाही. आपल्याला दुसऱ्यांचा विचार करायला कारण ते आपल्या डोक्यावर आहे आणि मग तुम्ही त्यांच्याशी जागृतीविषयी बोलू लागता तेव्हां तुमचे सहस्रार निश्चितपणे आकारमानात व सूक्ष्मतेत विकसित होईल. त्याची संवेदनशीलता देखील वाढीस लागेल. त्याला अंतर्यामी खोलपणा येईल.

सहस्रार हे आत्म्याचे सिहासन आहे. सम्राट भव्य म्हणून सिहासनही भव्य. आत्म्याला तुम्ही जी वागणूक देता ती सहस्त्रारातून व्यक्त होते आणि अशा प्रकारे तुम्ही जागृति देऊ शकता आणि नंतर तुम्ही सूक्ष्मतर स्वरुपाचे होता. सहस्रार प्रकाशमय झाले की तुम्हाला नवीन प्रकाश सापडेल, सूक्ष्म वातावरणातील सूक्ष्म घटना पाहू शकाल, तुमची उच्चतर प्रगति होऊ लागेल. त्यावेळी तुमच्या अवतीभवतीच्या प्रकाशमय लहरी तुम्ही पाहू शकाल.

सहस्राराचे तत्त्व आहे पूर्णत्त्व. सहस्रारात सर्व चक्रे आहेत म्हणून सर्व देवता एक होतात आणि तुम्ही त्यांचे पूर्णत्व जाणू शकता याचा अर्थ जेव्हा तुमची कुण्डलिनी सहस्रारात येते त्यावेळी तुमचे मानसिक, भावनात्मक आणि अध्यात्मिक सर्व काही अस्तित्व एक होते. तुमचे शारीरिक अस्तित्व त्यात एकजीव होते त्याविषयी कोणतीही समस्या नंतर नसते.

बऱ्याचवेळा सांगितले की कसलीही इच्छा करु नका. आता हे नीट समजून घ्या की तुम्ही यापुढे सामान्य माणूस राहिला नाहीत, तुम्ही सर्व बंधनातून मुक्त झाला आहात. तुम्ही सहस्राराच्याही पलिकडे गेला आहात. सहस्रार आपल्या मस्तकामधे आहे



आणि ती जागा कमळाच्या बंद फुलासारखी आहे. कुण्डलिनी जेव्हां तेथपर्यंत येते तेव्हां हे कमळ फुलते. त्याचेच बायबलमधे वर्णन केले की 'मी ज्वालांच्या जीभांसारखा येईल ' त्याच्या पाकळ्या म्हणजे दुसरे काही नसून नाड्या (नर्व्ह) असतात आणि प्रकाशित झाल्यामुळे ज्वाळासारख्या दिसतात. पण त्या ज्वाळामधे दाह नसतो, त्या तापहीन असतात आणि खूप थंडावा देणाऱ्या आरामदायक असतात. म्हणजे हे कमळ उघडलेलेच राहिले पाहिजे कारण आपल्यामधे मानवी प्रवृत्ति अजून शिल्लक असतात. आपला अहंकार व संस्कार (प्रतिअहंकार) हे दोन फुगे वारंवार या कमळाला बंद करु पाहतात.

सहस्रार एवढे स्वच्छ झाले पाहिजे की साबण जसे प्रत्येक गोष्ट स्वच्छ करतो, तसे ते तुमची प्रत्येक गोष्ट स्वच्छ करेल आणि तुम्ही कशाचीही भिती बाळगणार नाही. दुसऱ्यांचा अहंकार व संस्कार याचीही पर्वा करणार नाही. ही जी पातळी आहे त्या पातळीला आपण पोहोचावयाचे आहे. तुमच्यात सर्व प्रकारच्या दु:खाचे निकारण करण्याची क्षमता येईल आणि तुम्ही इतरांना त्यांच्या दु:खात विरंगुळा आणि शांति मिळवून देणारे व्हाल.

तुमच्यात अशी महान घटना घडली आहे की सर्व सहस्रार अंतर्गत असलेल्या देवतांच्या सात पीठासह उघडले आहे. सर्व हे संपूर्ण तुमच्या आईच्या रुपात आले आहे. जी अतिशय नम्र आहे व महामाया आहे. ही घटना सर्व मानवजातीच्या दृष्टीने व संपूर्ण विश्वाच्या दृष्टीने अतिशय महान आहे की तुम्ही आत्मसाक्षात्कार घेऊ शकता, व दुसऱ्याला समजावू शकता.

मी सहस्रार उघडले ही सर्वात महान घटना आहे. अर्थात मी सहस्राराची स्वामिनी आहे. व सर्व चक्रांची स्वामिनी आहे. पण मी सर्व चक्रांच्याही पलीकडे आहे. फारच पलीकडे आहे. जर अशी परिस्थिति आहे तर तुम्ही सहस्राराची काळजी घेणे फारच महत्वाचे आहे.

सहस्रार स्वच्छ ठेवण्यासाठी हृदय उघडले पाहिजे. निरहंकारी झाले पाहिजे. प्रतिक्रीया नको. भौतिकतेला तुमच्यात प्रवेश देऊ नका समर्पण असावे.

आज जगात सगळीकडे उलथापालथ चालली आहे. मूर्खपणा, वादविवाद, भांडणे व आक्रमकपणा इ. चा अतिरेक होत आहे. अशा परिस्थितीकडेही तुम्ही साक्षीभावाने बघितले तरी सुधारणा घडून येईल. कारण तुमच्याजवळ ती शक्ती आहे व तुम्ही शक्तीशाली आहात. ही शक्ति कार्यान्वित करणारी यंत्रणाही तुमच्यामधेच असल्याने तुम्ही हे सहज करुं शकता. पण तेथेही अहंकार आडवा आला तर काम होणार नाही. अहंकार हा तुमच्या उत्थान प्रक्रियेमधील मोठा अडथळा पार केल्याशिवाय तुम्ही सहस्रारात येऊच शकत नाही. त्यानंतर सहस्रार उघडायला काहीच अडचण नाही. त्याला वेळही लागत नाही. पण अहंकार मधे आला की, अहंकारातच तुमचा प्रवास थांबेल.

अहंकाराच्याबाबतीत प्रत्येकाने सतर्क राहिले पाहिजे. कारण हे शेवटचे चक्र उघडल्यशिवाय पुढची प्रगति नाही. ते पूर्णपणे स्वच्छ होऊन उघडल्यानंतरच तुम्ही परमात्म्याशी जोडले जाणार आहात. मगच तुमचे सर्व प्रश्न दूर होणार आहेत. ते इतके क्षुल्लक व निरर्थक असतात की सहस्रार कार्यान्वित झाल्यावर त्याचा मागमुसही उरत नाही. अहंकारविरहीत असे तुमचे व्यक्तिमत्व सर्वांना लाभदायी ठरावे.





# विश्व-निर्मला-धर्म

(फेब्रुवारी १९८५ मध्ये नाशिक येथिल एका प्रवचनात प.पू.श्रीमाताजींनी सहजयोग्यांच्या धर्माला '' विश्व निर्मला धर्म '' असे अधिकृत नाव दिल्याची घोषणा केली त्या भाषणाचा संक्षिप्त सारांष)

सहजयोग हा एक असा नवा धर्म आहे की ज्यात सर्व प्रचलित धर्मांना सामावून घेतले आहे. या नवीन धर्मामधें सर्व प्रेषित व अवतरणांचा समावेश केला आहे. त्याला तुम्ही विश्व-धर्म म्हणू शकता. पण तरीही त्याचे असे खास वैशिष्ट आहे व ते दाखवण्यासाठीं मी त्याला विश्व - निर्मला-धर्म असें नांव देत आहे.तुम्ही आता स्वत:ला निर्मलाइट्स (Nirmalites) म्हणू शकता. कारण तुम्हाला प्रकाशित (Enlightened) करणारी ''निर्मला''आहे. तुम्हाला विश्व-निर्मला--धर्म हे नांव आवडेल असे मला वाटते. म्हणून आजपासून सहजयोग्यांचा धर्म '' विश्व- निर्मला-धर्म '' झाला आहे असे मी घोषित करते.

हा विश्व-निर्मला-धर्म अत्यंत शुध्द व अद्वितीय (Pure and Immaeulate) धर्म आहे. हा नवीन धर्म स्वीकारल्यावर तुम्ही कसल्याही चुकीच्या गोष्टी करणार नाहीं. त्याचबरोबर तुम्ही पूर्वी बाळगलेल्या सर्व परंपरा आणि आत्म्याला विसंगत अशा सर्व कल्पना, समजुती सोडून दिल्या पाहिजेत. आत्म्याला शोभा देईल अशाच गोष्टींचा तुम्ही या नवीन धर्मात स्वीकार केला पाहिजे. हेच आपल्या धर्माचे एकमेव सत्य आहे. माझ्या उपदेशामधून मी तुम्हाला हे सर्व शिकवत आहे व शिकवणार आहे. आपल्या या धर्मात सर्व प्रेषितांचा व अवतरणांचा आपण आदर करणार आहोत. त्यांच्या नांवाने आजपर्यंत जे जे धर्म प्रस्थापित झाले त्या सर्वांचे त्यांच्या शिष्यांनीच खच्चीकरण केले आहे. त्याचे कारण म्हंणजे त्यांची शिकवणूक चांगली असली तरी हे शिष्य 'जागृत' नव्हते. पण आतां तुम्ही हे सत्य सिध्द करु शकता व इतरांना ती अनुभूति देऊं शकता. त्याचे शारीरिक आरोग्याचे फायदे दाखवूं शकता. त्यांतूनच आधिकाधिक लोक सहजामधे येतील. एरवी 'धर्म' म्हटला की त्यांत बंधने, कर्मकाण्डे असणार असे लोकांना वाटते. पण आपल्या धर्मामधें आत्म्याला जे सुखदायी असेल व जे आपल्या आत्मोन्नतीसाठी हितकारक आहे त्यालाच फक्त मान्यता दिलेली आहे आणि ते सांभाळून आपण जीवनातून पूर्ण आनंद मिळवू शकतो.

मग आपण कोठल्या देशाचे नागरीक आहोत आपली जात काय, आपला वंश कोणता ह्या सर्व गोष्टी तुम्ही विसरुन जाता आणि पुनर्जन्म झाल्यासारखे एक सुंदर कमळ बनता आणि त्याचाच सुगंध सगळीकडे पसरवता.





प.पू. श्रीमाताजींनी दिनांक १८ जानेवारी १९८० रोजी राहूरी येथे सर्व सहजयोग्यांना केलेला उपदेश

आता आपण इथे सगळी सहजयोगी मंडळी आहोत. एका अर्थाने हे फार बरें आहे की आपण असे भेटलों, म्हणजे आपाअपल्या हितगुजाच्या गोष्टी करुं शकतो, आणि त्याबद्दल जे काही बारीकसारिक असेल ते सुध्दा एक दुसऱ्यांना सांगू शकतो.

परवा मी सांगितले कीं आपण स्वत:ला कसे स्वच्छ केलें पाहिजे. कारण आपल्या आईचे नांवच मुळीं निर्मला आहे. आणि या नांवामध्ये पुष्कळ शकत्या आहेत.

पहिला शब्द 'नि' आहे. नि म्हणजे नाही. जे नाहीं पण जे आहे, असें वाटते, त्याचें नांव आहे महामाया. तसेच हे सर्व संसाराचें आहे.हें दिसतें आई, पण हें कांही नाहीं आहे. हें दिसतें आहे, पण हें कांही नाही आहे; ह्याला जर आपण बधितलें आणि ह्याच्यत जर आपण फसलेले असलो, की असे वाटते की हे सगळे काही हेच आह. अर्थिक परिस्थिती वाईट आहे, सगळे वाईट दिसते, चांगलें काही दिसत नाहीं. समुद्राच्या वरच्या थरावरचें पाणी अत्यंत गढुळ, घाणेरडे, त्याच्यामध्ये कांहीं वस्तु तरंगत सुध्दा असतात. पण त्याच्या खोलांत गेलं कीं इतके सौदर्य, संपदा, शक्ति वगेरे सर्व काही असतें, की त्यापुढे वरती कांही घाण वगेरे होती हें लक्षांतसुध्दा राहत नाही. पण सांगायचे म्हणजे हा सगळा भ्रम आहे. हें जे काही बाह्यातले आहे तो सगळा भ्रम आहे. ''हे ते नाही'' हे पहिल्या प्रथम तुम्ही लक्षांत घेतले पाहिजे. 'नि' शब्दाची स्थापना म्हणजे ' हे नाहीं आहे.' कोणताही विचार आपल्यामध्यें उठला की म्हणायचे 'हे नाही', ''हे ते नाही'' इथून सुरवात करायची. या ''नेती नेती वचने विगमो अवोचुस'' हें नाही आहे हा विचार नाही आहे. परत हा विचार नाही आहे असे म्हणत गेले, म्हणजे 'नि' शब्द जो आहे, विसर्गासहित नि आहे. त्याचा अर्थ लागतो. जो भ्रम आपल्याला दिसतो त्याच्यापलिकडे कांहीतरी आहे. ह्या भ्रमामध्यें आपण इतके भरमसाठ दिवस घालवले आहेत, आपले आयुष्य इतके व्यर्थ घालवलें आहे की जें नाही ते महत्वाचें वाटते आणि त्यामुळें आपण पुष्कळ पापांचे ढीग एकत्र केले. ह्या गोष्टीत आनंद मिळेल, त्या गोष्टीत आनंद मिळेल, त्याच्यामध्यें सुख मिळेल, ह्याच्यामध्ये सुख मिळेल, असा विचार करुन आपण जें कांहीं उपभोगण्याचा प्रयत्न केला त्याच्यामध्यें आपल्याला कांही मिळाले नाही, सारे नि:स्सार आहे. त्यांच्यांत सार नाही, नि: सत्व आहे.

तेव्हा अशी दृष्टी ठेवायची की '' हे नाही आहे, '' हें सगळे साफ झूट आहे. फक्त ब्रम्हच सत्य आहे बाकी सर्व झूट आहे. असा विचार करीत जायचें, मग '' सहज योगाला'' अर्थ लागतो. म्हणजे होते काय कीं बहुतेक सहजयोगी पार झाल्यावर, त्यांना असें वाटलें कीं आपण आतां पार झालो, माताजींचा आमच्यावर आशिर्वाद आहे, मग आमच्याजवळ ऐश्वर्य कां येत नाही? म्हणजे ऐश्वर्यामध्ये परमेश्वर आहे असें त्यांना वाटतें. पण पार झालो तरी आमचा स्वभाव कां बदलत नाहीं असा पहिल्यांदा विचार केला पाहिजे. तेव्हा मग लक्षांत येईल कीं आपला स्वभाव बदलत नाही. 'स्वभाव' शब्द किती सुंदर आहे बघा. 'स्व' म्हणजे आत्मा, त्याचा भाव, जर आपण मिळवला, तर बाह्यात कांहीही जरी असले तरी आतले जे इतकें सुंदर आणि अनुपम आहे कीं तें बाह्यांतले नुसतें नाटकासारखें वाटलें पाहिजे. हे साक्षी स्वरुपत्व जे आहे तें जोपर्यंत

ध्यानांत निर्विचारता मिळवण्याला सतर्क राहून सातत्याने प्रयत्न करणें फार महत्वाचे आहे. त्यानें परमेश्वरी शक्तीशी एकाकारता येते. बिंदु सागरांत मिसळण्यासारखी ही स्थिती आहे.



तुमच्यामध्ये पूर्णपणें जागृत होत नाही तो पर्यंत 'नि' शब्दाचा अर्थ तुम्ही लावलेला नाहीं, आणि त्याचा उपयोगही केला नाही. असे जर मनुष्य लक्षात घेईल, की आपण अजूनही 'नि' वर बसलेलो नाही आणि अजूनही आपण कधी तरी भावनेच्या आहारीं दुसऱ्यांवर जबरदस्ती करतो किंवा कांही तरी उगीचच सहन करीत बसतो व त्याच्या बद्दल आपण रडत असतो कीं आपण एवढें सहन केलें. त्याच्या मधोमध आपली स्थिती आहे 'नि'वर म्हणजे हेही नाहीं तेही नाहीं ती स्थिती ध्यानामध्यें फार उत्तम होते नुसत्या 'नि' शब्दाचा जरी तुम्ही माग घेतलात तरीसुध्दां होऊ शकते.

पहिलें निर्विचारतेंत यायचे, कोणताही विचार, मग कसाही असेना का, सुष्ट-दृष्ट कसाही असेना का, त्या विचारावर जर का उडया मारायला सुरवात केली, एकदा का तें JUMPING सुरु झालें, की तुम्हांला एक प्रकारचा 'इनरशिया' येतो, म्हणायचे तर स्थिती स्थापित होते आणि ती स्थिती आली म्हणजे, तुम्ही प्रत्येक विचारावर उडतच असता. ह्या विचारावरुन त्या विचारावर त्या विचारावरुन दुसऱ्या विचारावर. म्हणून इतरेजनांनी असें सांगितले कीं, एखादा वाईट विचार आला कीं त्याला स्पष्ट विरोध करावयाचा. म्हणजे इकडून एखादी जर गाडी आली, तर त्याला दुसरी गाडी जर रेटली, दोन्ही गाडया मग कुठतरी मधोमध येतील. एका अर्थानं बरोबर आहे, पण कधीं कधीं त्यानें नुकसान होऊ शकते. म्हणजे तिकडून एक विचार येतो आहे आणि आपण इकडून एक चांगला विचार काढला, की तो विचाराच्या उलटया आपण घालायचा तर तो विचार दबून परत चुपचाप बसेल आणि कुठेंतरी एकदमच निघेल, असेंही होऊं शकते आणि असें पुष्कळांचे होते. आपण कांहीं तरी चांगले केलें पाहिजे, नेहमी चांगले वागले पाहिजे, दुसऱ्यांशी चांगले राहिले पाहिजे असे विचार घेऊन लोक चालले की त्रास होतो. एकदम कधींतरी तो राग निघतो. कधींतरी एकदम तो संताप होतो की लोकांना समजत नाहीं की हे एवढे शहाणपणाने वागणारे एवढे चिडले कसे? आंतली शांतिसुध्दा सुटते आणि आतले जे काही सौंदर्य आहे ते नष्ट होऊन जाते. तेव्हा काय करायचे? तर निर्विचारतेत रहावयाचे. विचार हा निशिध्द मानला पाहिजे. अगदी निर्विचारीतेंत आपण राहिलों, म्हणजे मधोमध'विलंबात' - आपण आलो. विचारच सोडायचा एकदम प्रयत्न केला पहिजे. आतां लोकांना म्हणतील कीं माताजी विचाराशिवाय कसें होणार? पण हे विचार आहेत काय? पोकळ गोष्टी आहेत. निर्विचारतेंत तुम्ही आलांत की तुम्ही आणि परमेश्वराची शक्ती एकाकार झालेली असते. म्हणजे तुमचा बिंदू परमेश्वराच्या सागरांत आला. तेव्हा त्याची शक्ति तुमच्यांत आली. आतां हे बोट काय विचार करतें काय ? पण फिरतें ना ? विचार 'त्याला' द्यायचा, तूं कर आमचा विचार पण हे कठीण जातें कारण आपण निर्विचारितेत नसतो. पुष्कळ जण म्हणतात आम्ही सगळे समर्पण केले पण तसें कांहीं जुळत नाही, बोलायच्याच गोष्टी होतात पण समर्पण बोलायचें नसते. निर्विचारता गाठायची म्हणजे समर्पण. म्हणजे विचारच सोडला की आपण मधोमध आलो. मधोमध आल्याबरोबर आपण 'निर्विचारतेंत' म्हणजे परमेश्वर शक्तीशीं एकाकार झालो. परमेश्वर शक्तिशी एकाकार झालो की तोच सगळे बघतो आपले, बारिक- सारिक आपल्याला आश्चर्य वाटेल. पण हें करुन बघण्यासारखे आहे आणि करुन बघितल्यानंतर तुमच्या लक्षांत येईल की पूर्वीचा मार्ग चुकिचा होता.

तर आपण फक्त निर्विचारतेंत राहिल्याबरोबर सर्व प्रेरणा, सर्व शक्त्या, सर्व काहीं मिळते. अगदी निर्विचारितेत राहिल्याबरोबर, जी कल्पना आपल्यामध्यें येते, ती प्रेरणात्मक असते आणि आपल्याला आश्चर्य वाटेल कीं, सर्व कांही समोर ताट वाढल्यासारखे येते. भाषणाला उभे राहिलें की निर्विचारितेत उभे राहायचे, कांही विचार येऊ द्यावयाचे नाहींत. नुसते तुम्ही निर्विचरितेत उभे राहिलात आणि बोलायला लागलात तर ज्यानें कधीही भाषण दिले नव्हते, ज्याला भाषण कसे द्यायचे हे माहित नाहीं, ज्याला काही विशेष ज्ञान नाही असे असूनही तुम्ही बोलालया उभें राहिल्यावर असें बोलाल , की लोकांना आश्चर्य वाटेल कीं एवढे ज्ञान ह्यांच्याकडे कुठून आले? निर्विचारितेत तार लागली, की हे सगळे तिथून येते. तुमच्या डोक्यातून काही येत नाही. आतां आमचें आम्ही सांगतो आपल्याला. आतां आपण प्रार्थना केली की ' आई आमचें हे कार्य करुन घे' ते आम्ही विचारात घेत नाही. निर्विचारितेत घेतलें की तिकडे सारी मशिनरी तयार आहे. तिच्यात घालायचे की खट खट तयार होऊन समोर हजर; त्या मशिनरीला काम करुं द्यायचे. Silent मशिनरी म्हटली पाहिजे, त्या शांत मशिनरीमध्ये आपले प्रश्न घालले पाहिजेत. पण तें बुध्दीजीवी लोकांना फार कठीण. कारण प्रत्येक गोष्टींत विचार करायची सवय त्यांना लागलेली असते.

कोणताही विषय आकलन करतांना निर्विचारिता साधता आली पाहिजे. आपोआप समोर गोष्टी येतात. आतां तुम्ही संशोधन करतां संशोधन करतांनासुध्दा ते निर्विचारितेत करा, हात चालवायचे फक्त, निर्विचारितेत. बरोबरच संशोधन जमेल तुम्हाला. आतां मी कितीतरी गोष्टी सांगते, मी कधी जन्मात सायन्स वाचले नाही, तसले मला कांही माहित नाहीं; पण सगळें सांगते, हे सगळें ज्ञान कोठून येते? तर त्या निर्विचारितेतून. मी नुसती बोलून राहिले आहे, नुसती बघते आहे,जाते आहे ते सगळे आधी तयार केले होते, कॅम्प्युटर मध्ये तो बोलतो आहे आपला सटासटा पण तुम्ही त्या कॅम्प्युटरच्या वर आपलें डोके लावले आहे. तो एवढा जुना कॅम्प्युटर बनवलेला आहे, एवढी मेहनत केली आहे, त्याचे एवढे अचूक सगळें काम करुन ठेवलेले आहे, आणि तुम्ही त्या कॅम्प्युटरचे न ऐकतांच आपलेच चऱ्हाट लावलेले आहे, तर तुमच्या हातून चूका होणारच. त्याला कांही अर्थ आहे?

तर याला शब्द 'प्र' आहे आणि प्रशिक्षण वगैरेला आपण 'प्र' शब्द वापरतो. 'प्र' म्हणजे निर्विचारितेत जे कांही घडते ते सगडशॅ 'प्र' आहे ते इतके 'प्रचंड' आहे, पहा प्र-चंड, चंड आहेत पण चंडावरती 'प्र' आहे. ' प्रकाशित' प्रज्ञ असे 'प्र' ह्या शब्दाचा अर्थ असा आहे की Enlightened प्रकाशित आहे. प्रकाश बोलतो का कांही? आतां समजा ह्या खोलीत आपण प्रकाश केला, तर तो कांही बोलत नाही, की विचार देत नाही, तर दाखवतो स्पष्ट की हे आहे ते आहे. तसाच निर्विचारितेचा प्रकाश आहे. निर्विचार, निर्वाज्य, निरंकारी, निराकार असे अनेक शब्द 'नि' पासून येतात. मग निर्विकल्पांत येतां येतं. आधी निर्विचार व्हायचे मग निर्विकल्प, मग विकल्प सुटतात. म्हणजे कळते की कांही तरी शक्ति आहे आणि ती सगळी कार्य करते. पटापट आणि ती कशी कार्य करते, अगदी बारीक असतें तिचे काम. तुम्हाला अगदी आश्चर्य वाटेल की असे कसे घडते. आता वेळेचे पण तसेच आहे म्हणून आम्ही घड्याळात कधी बघत नाहीं. कधी कधी घड्याळ बंद पडले म्हणजे म्हणजे १ च्या वेळेला ३-४ वाजलेले असतात. पण आमचे खरे घड्याळ निर्विचारितेत असते. ते थांबलेले घड्याळ आहे.Permanent ज्या वेळेला जे करायचे ते घडून येते. मग काही वाईट नाही वाटत; उशीर झाला तरी, नाही झाला तरी, काही झाले तरी आपण आहोत ना जिथे आहोत तिथे? आतां काल गाडी फेल झाली, पण आम्ही बसलो आरामात. कारण आम्हाला बघायचे होते तारे, चांदण्या वगैरे.



आमच्या लंडनला तारे कधी बघायला मिळत नाहीत. ते एक सौंदर्य पाहायचे होते, त्यावेळी आकाशाला वाटले माताजींनी आपले सौंदर्य पहावे. कधी कधी त्याच्याकडेही बघितले पाहिजे ना? मजा वाटत होती. म्हणजे काय आहे कीं आपण कोणाची बंदीश करायची नाही. फक्त निर्विचारितेत राहिले की परमेश्वर आपल्याला अगदी हातावर सांभाळून सगळीकडे नेतो. सगळी व्यवस्था तो करतो. त्याला कांही सांगावे लागत नाही त्याला सगळे माहित आहे. पण तुम्ही त्या प्रवाहात आहांत की नाहीत हे पाहिले पाहिजे. आणि जर तुम्ही त्या प्रवाहात नाहीत तर मात्र तुम्ही अजून काठावरच अडकलेले आहात.मग तो प्रवाह येतो, ढकलतो, दोन तीनदा काढतो, पण तुम्ही परत चालले काढावर ! आपली गणेशस्तुती फार सुंदर आहे त्यात म्हटले आहे 'पडता प्रवाही' प्रवाही शब्द वापरलेला आहे. प्रवाहांत जेव्हां आम्ही पडतो, प्रवाहांत वाहायचे म्हणजे त्याच्यामध्ये आपला प्रवाह नको 'प्र-वाह', परत 'प्र' आला. वाहन करतो, परंतु 'प्र' एनलाईटन्ड जो आहे, त्या प्रवाहात पडा. 'पडता प्रवाही. तसेच 'निर्वाणि रक्षावे'; आमचे जेव्हा निर्वाण होईल तेव्हा तुम्ही आमचे रक्षण करा. 'रक्ष रक्ष परमेश्वर' असे आपण परमेश्वराला म्हणतो. पण आम्हीच आमचे रक्षण करत बसलो आहोत! मग परमेश्वर कशाला तुमचे रक्षण करणार ? तो म्हणतो, चला ! चला ! चालू दे थोडेसे होऊ दे त्यांचे रक्षण ! तर मुद्दा असा कीं आपण आपल्या गांभिर्यात उतरायला शिकले पाहिजे. हे निर्विचारितेतले समजले पाहिजे म्हणजे 'निर्विकल्प' होणार. 'निरासक्त; ' आसक्तता नसली पाहिजे. माझा मुलगा, माझी मुलगी हे आपल्याकडे फार आहे. इंग्लंडमधे उलटे आहे तिकडे माझा मुलगा, माझी मुलगी नसते. मी फक्त माझ्यापुरते. इकडे माझा मुलगा, माझे घर असे 'माझे माझे' चालले की शेवटी तसेच होते. शेवटी मग मीच राहून जाते. माझे काही नाही, तुझेच सर्व काही आहे. कबीराने फार सुंदर लिहिलेले आहे की बकरी जेव्हा जिवंत असते तेव्हा बँ बँ करीत असते, परंतु तिला मारल्यानंतर तिच्या आतड्याच्या तारा करुन त्या जेव्हा धुनकीला लावतात तेव्हा त्याच्यातून 'तूही-तूही' तूच एक आहेच तूच एक आहेस असा ध्वनी निघतो. तसे आपले झाले पाहिजे. मी नाही माझे अस्तित्वच नाही असे आपण एकदा ठरवले म्हणजे नि शब्दाला अर्थ लागतो.



नंतर आपण 'ला' शब्द घेऊ या. ला शब्द हा ललितेचा शब्द आहे. माझे दुसरे नाव 'ललिता' आहे. हे देवीचे वरदान आहे. हे देवीचे अस्त्र आहे. 'ला' म्हणजे देवी जेव्हा 'ललित' होते; किंवा शक्ति जेव्हा ललित होते- ललित म्हणजे कार्यशील- तिच्यामध्ये जेव्हा लहरी येतात, तुमच्या हातात लहरी आहेत, हातामध्यें ह्या लाटा येऊन राहिल्या आहेत. ही शक्ति जेव्हा कार्यान्वित होते; त्या शक्तिला 'ललित' शक्ति म्हणतात. ती अत्यंत सौदर्यशाली आहे, प्रेममय आहे. प्रेमाची शक्ति जेव्हा कार्यान्वित होते ती ही 'ला' शक्ति आणि सगळीकडे तुमच्यावर आवरण आहे. ती कार्यान्वित आहे. ती कार्यान्वित असल्यावर, मग कशाला काळजी करायची? तुमची काय हो शक्ति आहे? अहो एकाही झाडातून तूम्ही फळ काढू शकत नाही, एकाही ! काढून दाखवा पाहू फळाचे सोडाच तुम्ही एक पानसुध्दा काढू शकत नाही. एक मूळ काढू शकत नाही हे जे सर्व कार्य जी शक्ति करते ती 'ला' शक्ति आहे. इतकेच नाहीं, तर तुम्हाला पार केले ती सुध्दा 'ला' शक्ति आहे. त्या शक्तितूनच 'म' शक्ति आणि 'नि'शक्ति अश दोन्ही शक्त्या निघालेल्या आहेत. म्हणजे 'नि' शक्ति ही ब्रह्मदेवाची शक्ति सरस्वती ही आहे आणि 'सरस्वती' शक्तिमध्ये मनुष्याला 'नि' पणा आला पाहिजे. 'नि': पणा म्हणजे पूर्णपणें अनासक्तता, अनासक्तता यायला पाहिजे, 'ला' शक्तिमध्ये प्रेम आहे आणि तीच शक्ति इतरांशी आपला संबंध जोडते. 'ललाम' 'लावण्य' ह्या सर्व शब्दामधे 'ला' शब्द येतो. 'ल' ह्या शब्दाला एक गोडवा आहे आणि त्या गोडव्याने आपण सर्वांना भारावून टाकले पाहिजे. सगळ्यांशी बोलतांना आपण ती शक्ति वापरली पाहिजे. म्हणजे सगळीकडे चराचरामध्ये ती शक्ती, ती प्रेमशक्ती पसरली असतानां आपण काय केले पाहिजे? एक तर विचार सोडला पाहिजे पहिल्या शक्तीचा. कारण पहिल्या शक्तिमुळे विचार उत्पन्न होतात आणि शेवटल्या शक्तिमध्ये काय केले पाहिजे? जी 'ला' शक्ति आहे त्या शक्तिमध्ये आपण, त्या प्रेमाचा आनंद घेतला पाहिजे. तो कसा घेणार? एकाकार, तन्मय होऊन आपले प्रेम दुसऱ्यावर किती आहे हे कोणी कधी मोजते का? ते मोजले पाहिजे. काय मजा येते अगदी ! वा: किती आपले प्रेम आहे हो सगळ्यांवर ? असें कधी येते की नाही तुमच्या डोक्यातं? माझे



तसेच असते; नेहमीच मला हे वाटते काय हो हे प्रेम वाहून राहिले आहे बरे ? किती छान वाटते बरे? पण तसे तुम्हाला वाटते की नाही मला माहित नाही. माणसाचे मला समजत नाही एवढे पण तसे मला वाटते. वाह काय प्रेम वाहते आहे? जसा एखादा स्वरकार किंवा एखादा कलाकार जेव्हा आपलें संगीतात मग्न होतो, तेव्हां जसें त्याला वाटतें कीं काय आपलें संगीत वाहून राहिलें आहे ? तसें हें प्रेम नुसतें अबाधित वाहिलें म्हणजे ती 'ललाम' शक्ति तीच ह्या लाटांची शक्ति आणि तीच ही ललित शक्ति आहे. तर त्या 'ललित' शक्तिला प्राप्त झाले पाहिजे.

त्याच्यामध्यें पहिलें असें की दुसऱ्याकडे आपली जी दृष्टि असते ती कशी आहे त्याच्याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. म्हणजे खालच्या प्रतीच्या, म्हणजे निम्नस्तरावरच्या लोकांची दृष्टी दुसऱ्यांच्याकडे नेहमी अशी असतें की त्यांचे काय मारायचे, ह्यांच्याकडून आपले काम कशा प्रकारे करुन घ्यावयाचे. अशी ही निम्नस्तरातील लोकांची दृष्टि असते. त्याच्यावर दुसरे कांही लोक असे असतांत कीं दुसऱ्यांचे काय वैगुण्य असेल तें बघत असायचें. त्यांच्यात त्यांना काय आनंद मिळतो मला माहित नाही. ह्या माणसाला हेंच नाही आहे, त्याचें तोंडच वाकडे आहे, त्याचें घरांत पटतच नाही वगैरे. पण त्याने काय मिळणार आहे

आपल्याला? मनुष्य अशानें माणूसघाणा होतो, आणि त्याने माणसाला स्वत:ला त्रास होतो तेव्हा स्वत:ला त्रास कसा करुन घ्यायचा ते माणसाकडूनच शिकलें पाहिजे. मला कांहीं तें जमत नाहीं. अहो मला तर सगळ्यांना भेटले कीं केवढा आनंद होतो.

तर ही ललाम शक्ति जी आहे. ती वापरायची, त्या शक्तिला आपण असें वापरले पाहिजे की दुसऱ्याच्याकडे पहातानां आपण निर्विचारितेंत जावे. निर्विचारितेतं गेल्याबरोबर, त्या माणसांतही निर्विचारता येईल. म्हणून मी म्हणते बंधन द्या. 'नि' शक्ति आणि 'ला' शक्तीला जर बंधने दिली, म्हणजे 'ला' शक्तिला जर 'नि' मध्ये आणले तर फार फायदा होतो. आतां पुष्कळांना सांगावे लागते कीं डावी बाजू उचला व उजवीकडे घाला. अती गर्वी लोकांना म्हणजे, मी फार कार्य करित आहे असे ज्या लोकांना वाटतें किंवा जे फार कार्यरत असतात त्यांना सांगते की डावी बाजू उजवीकडे घाला. म्हणजे स्वत:चे जें प्रेम आहे ते आपल्या पांचही तत्वात भरायचे. जसे कॅनव्हासवर आपण रंग भरतो तसे आपल्या हृदयांतलें जे प्रेम आहे, ती प्रिती जी आहे, ती आणून आपल्या कार्याची जी शक्ति आहे त्याच्यामध्यें ही शक्ति भरायची. ती शक्ति एकदा भरली कीं अशा माणसाला रंग चढतो आणि तो हळू हळू असा पसरतो. त्याची प्रीति अशी वाहते. मराठीत एक शब्द आहे 'स्नेहाळते' त्याची कृती जी आहे ती स्नेहाळते आणि अशा माणसाला असा कांही रंग चढतो व असा काहीं आकर्षक बनतो की अशा माणसाजवळ तासनतास बसला तरी असें वाटतें की आपण बसलो आहोंत कुठे तरी. छान निवांत असे, तर ती प्रीति स्नेहाळली पाहिजे, त्याचा उपयोग असा होतो की माणसें जोडली जातात. आपलेपणा वाढतो. सगळ्यांना वाटते कीं कुठेतरी असे स्थान आहे, जिथे आपल्याला प्रेम स्नेह सगळें मिळणार आहे. तर ही प्रभूची जी प्रेमाची शक्ति आहे, तिला जोपासली पाहिजे. आपल्यामधे जर असे विचार आले कोणतेही, तर आपण समजले पाहिजे कीं आपण त्या गंगेमध्ये घाण टाकतो आहे. असा जर आपण विचार ठेवला तर आपली जी 'ला' शक्ति आहे, प्रेमळ शक्ति आहे ती पूर्णपणे स्वच्छ राहिल. अगदी स्वच्छ राहिल आणि त्याच्या स्वच्छतेंत आपल्याला खूप आनंद वाटेल. दुसऱ्यांच्याकडे पहाण्याच्या दृष्टिमध्यें कसलीही चिकित्सकता असतां कामा नये. मला जर तुम्ही कोणाविषयी विचारलेत की हे



गृहस्थ कसे आहेत, तर मी फार तर कुंडलिनीवर सांगू शकेन, की ह्यांचे कोठले चक्र पकडले आहे, किंवा त्यांचे हे धरतें कधी कधी. पण त्याच्या पलिकडे, हे गृहस्थ कसे आहेत, त्यांचा स्वभाव कसा आहे असे जर कोणी विचारले, तर माझ्या लक्षांतच येत नाहीं ती गोष्ट. मी म्हणते, अहो स्वभाव म्हणजे काय? दोन मिनिटाची गोष्ट . आज नदी इथें वाहाते आहे तर उद्यां कोठे वाहणार आहे? काही सांगता येणार नाही. आतां तुम्ही कोणत्या मुक्कामावर बसला आहांत ते पाहायचे आहे. तुम्ही जर इकडेच बसलात घाणीत तर इथे, वाहाते आहे ते विक्षिप्त वाटणारच तुम्हाला. आम्ही सागराकडे पाहात आहोंत तर ही नदी कुठें येणार ते आम्हाला माहित आहे. आणि परिवर्तन हे सहजयोगांत नेहमी होत असते तेव्हा कोणत्याही माणसाला असा ठपका देऊं नये की हा मनुष्य अगदी कामातून गेलेला आहे. आतां हा कांही कामाचा नाही. तर असं नाही म्हणायचे नाही. प्रत्येक माणसामध्ये परिवर्तन होणार आणि झालेच पाहिजे नाहींतर आपल्या सहजयोगाचे कार्य म्हणजे परिवर्तनच आहे. तेव्हा ज्यांचा सहजयोगावर विश्वास आहे. त्यांनी कोणत्याही माणसाला असें म्हणता कामा नये की ' हा कामातून गेला'. प्रत्येक माणसाला ह्याची पूर्णपणें सवलत दिली पाहिजे. आतां आपणच बघतो की आम्ही कोठे होतो व कोठें आलो आणि आतां नदी कुठें चालली पुढे. असा जर विचार केला, तर तुम्ही स्वत:ची तर इज्ज़त करालच पण दुसऱ्याची पण कराल, स्वत:ची ज्या माणसाला इज्ज़त नसते तो दुसऱ्याची करत नसतो. तेव्हा 'ललाम' शक्तिला खूप वाढवले पाहिजे. ह्याच्यावर बोलायला लागले तर एक पुस्तकच लिहावे लागेल. पण त्याची मजा काय आहे ते मी तुम्हाला सांगु शकणार नाही. कारण ते शब्दांत घालायचे म्हटले तर जसे स्मित जर तुम्ही अंकित कराल पण त्याचे इफेक्टस तुम्ही सांगू शकणार नाहीत त्यातलेच ते आहे. ह्या शक्तिला खूप वाव दिला पाहिजे, वाढवली पाहिजे.



# भगवान महावीर

कमळाच्या शेकडो पाकळ्या असतात. त्या सर्व एकाच देठातून उमललेल्या असतात. भारतीय संस्कृतीमध्येसुध्दा विविध आचार-विचारांच्या, श्रध्दासमजुतीच्या शेकडो पाकळ्या आहेत. पण त्या एकाच तत्वातून विकसित झालेल्या आहेत.

भारतीय संस्कृतीला वटवृक्ष मानले, तर जैन धर्म ही त्या वटवृक्षाची एक मोठी शाखा आहे. जैन धर्म खूप प्राचीन आहे. ह्या धर्माचे चोवीसावे माहापुरुष महावीर आहेत तर पहिले ऋषभदेव महापूरुष होते. त्याकाळी उत्तर भारतात अशी गणराज्ये पुष्कळ होती. काशी,कोसल, विदेह, वैशाली अशी काही गणराज्ये विशेष प्रसिध्द होती त्यातील वैशाली येथील लिच्छवींचे गणराज्य खूपच चांगले होते. त्यांचे आठ विभाग होते. सिध्दार्थ हा त्या विभागाचा राजा होता.त्याला त्रिशलादेवी ही बहीण होती. इसवी सन पुर्व ५९० मध्ये चैत्र शुध्द त्रयोदशीच्या दिवशी त्रिशलादेवींना पुत्र रत्न प्राप्त झाले. त्याच्या आगमनाच्या चाहूलीपासूनच संपूर्ण राज्यात सुख वाढू लागले. म्हणून त्याचे नाव 'वर्धमान' असे ठेवले.

वर्धमानाची हुशारी,त्याची निर्भयता, त्याची नम्रता वगेरे गुण लहानसहान गोष्टीतूनही दिसू लागले. एकदा लहानपणी खेळताना त्याचा चेंडू सापाच्या वेटोळ्यात पडला होता तो त्याचा जवळ गेला तेव्हा सापाने आपला फणा मिटून घेऊन बाजूला गेला.

एकदा वैशाली नगरीच्या राजरस्त्यावरुन एक मस्तावलेला हत्ती सैरावैरा धावत सुटला होता. त्याने आपल्या माहुताला सोंडेने पकडून पार चेंदामेंदा केला. माणसे त्याच्या तावडीत सापडू नये म्हणून सुसाट धावत होती. वर्धमानने राजवाड्याच्या खिडकीतून हे दृष्य पाहिल्यानंतर तो रस्त्यावर आला आणि त्या मस्तावल्या हत्तीसमोर शांत दृष्टीने पाहिले. हत्तीने त्याच्याकडे पाहिले आणि भडकलेल्या अग्नीवर पाणी टाकतात तसा हत्ती एकदम शांत झाला. वार्धमानने त्याच्या सोंडेवरुन प्रेमाने हात फिरवला. सर्वांनी वर्धमानचा जयजयकार केला.हातामध्ये कोणतेही शस्त्र न घेता,कोणालाही न मारता वर्धमानने जे वेगळेच शैर्य दाखविले ते पाहून सर्वजण त्याला ''महावीर वर्धमान '' अशा नावाने हाक मारु लागले.

योग्य वय होताच वर्धमान पाठशाळेत जाऊ लागला. तो सतत कसल्यातरी विचारात बुडून जायचा. त्याच्या मातापित्यांना याचे हे अकाली गांभीर्य बरे वाटेना. त्यांनी त्याचा विवाह करण्याचे ठरवीले. समरवीर नावाच्या महासामंताची मुलगी यशोदादेवी हिच्याबरोबर वर्धमानचा विवाह झाला. तरीही तो घरात अनासक्त



वृत्तीने रहात होता. त्याने आपल्या शरीराचे कोणतेही लाड केले नाही.वैराग्य त्याच्या रोम रोमात भिनले होते.

एके दिवशी वर्धमान रथातून जात असताना रस्त्याच्या बाजूला एक मनुष्य रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असल्याने तो त्याच्या जवळ गेला असता बाजूच्यानी त्याला सांगितले की त्याला स्पर्श करु नकोस तो शूद्र आहे. त्याने राजवैध्याला बोलावले त्याने देखिल लांबूनच औषधे टाकली. धर्माच्या या कल्पनांबद्दल त्याच्या मनात चिंता,रोष याचे जाळे पसरले.

वर्धमानला काही दिवसापूर्वीचा जनावरांचा बाजार आठवला. त्यामध्ये एकाने शेकडो बैल यज्ञासाठी खरेदी केले होते. त्याला वाईट वाटले, बैल मारुन देव कसा प्रसन्न होणार हे त्याला समजेना.

त्याने या घटना पत्नी यशोदेला सांगितल्या.' मी लोकांचे विचार आणि आचार बदलायचा प्रयत्न करणार. सर्व प्राणिमात्र आपापसांतील वैरभाव विसरुन एकजीव होऊन राहतील असे जग मला निर्माण करावयाचे आहे. त्यासाठी सामर्थ्य मिळवण्यासाठी तपश्चर्या करणार असल्याचे सांगितले त्यावेळी त्यांना एक प्रियदर्शनी नावाची मुलगी होती. तपश्चर्यसाठी घर सोडायला पत्नीने परवानगी दिली. त्यानंतर त्याने वडिलबंधूचा आशीर्वाद घेतला. मार्गशीर्ष शुध्द दशमी या दिवशी जैन धर्माची दीक्षा घेऊन रथात बसला आणि गावाबाहेर आला. स्वत:च्या अंगावरील सर्व अलंकार भोवतालच्या याचकांना वाटून टाकले. आपले उत्तरियही एकाला देऊन टाकले. पादत्रानेही दान केली. एका कटियस्त्राचा अर्धा तुकडा दान केला आणि पुढे चालू लागला.

एकटा असलेला वर्धमान गावोगावी जाऊ लागला. तो गावाबाहेर एखाद्या झाडाखाली राही. गावातून मागून आणलेले भिक्षान्न हातावर घेऊन खाई. अशा प्रकारे उन्हात, पावसात, काट्याकुट्यात, कधी लोकांचे नमस्कार घेत तर कधी शिव्याशाप ऐकत वर्धमान अखंड बारा वर्षे हिंडत होता. एकदा वर्धमान असाच रान तुडवीत असताना त्याचे कटिवस्त्र एका काटेरी झुडपात अडकले. वर्धमानने त्या एवढ्याशा वस्त्राचाही मोह नको म्हणून ते तेथेच टाकून दिले. तो आता अगदी नग्न झाला होता. अशा अवस्थेत रहाण्यासाठी आवश्यक असणारे मनोबल त्याने कमावले होते.

ह्या काळात तो राजगृह, चंपा,भदिया, वैशाली, नालंदा, मिथिला, वाराणसी, कौशांबी, अयोध्या, श्रीवस्ती, लाट वगेरे प्रदेशात हिंडला. लोकांनी कधी त्याचे स्वागत केले तर कधी तिरस्कार अवहेलना केली. त्याला निंदा स्तुति समान झाली होती, तो निष्पंद अवस्थेला पोहचला होता.

त्यानंतर तो अनार्यांच्या लाट प्रदेशात शिरला ते लोक सन्याशांचा द्वेष करीत. त्यांनी त्याच्यावर लाठ्याकाठ्यांचा वर्षाव केला. रानटी कुत्री सोडली ती त्याला अनेक ठिकाणी डसली. पण वर्धमान शांतच राहिला त्याने जराही प्रतिकार केला नाही. एकदा प्रत्यक्ष देवांनीच वर्धमानच्या सहनशक्तीची परिक्षा पाहिली. गावच्या स्मशानभूमीजवळ यक्षाने त्याला आडवले आणि चितेतील गरम राख अंगावर टाकली. त्याचे सर्व अंग पोळून निघाले. तरी त्याने हू का चू केले नाही. शेवटी यक्ष त्याला शरण आला.

श्वेतांबी नगरीत जाण्यासाठी असणाऱ्या दोन मार्गापैकी एका मार्गावर चंडकौशिक नावाचा भयानक नाग असून तो येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला डसतो आणि मारतो हे माहित असून देखिल वर्धमान त्याच मार्गाने जाण्याचे ठरवले. चालता चालता तो त्या नागाच्या कक्षेत आला. वर्धमान समोर दिसताच त्याने आपला प्रचंड फणा काढून समोर उभा राहिला वर्धमान शांतपणे एका जागी निश्चल उभे राहिले. नागाने रागाने त्यांच्याकडे पाहिले पण त्यांच्या चेहऱ्यावरील शांतता, निर्भयता, प्रसन्न स्मितहस्य पाहून तो शांत होऊ लागला वर्धमान म्हणाले '' उपशम भो चंडकौशिक !'' तो वर्धमानांच्या अंगावर चढला. वर्धमानांनी त्याच्या अंगावर प्रेमयुक्त हात फिरवला. तो नाग हळू हळू उतरला आणि निघून गेला.

वर्धमान श्वेतांबीहून पुढे निघाले. त्याठिकाणी एका श्रीमंत नागसेन याने त्यांना भोजनास बोलावले असता वर्धमान म्हणाले '' मित्रा आपल्याच नातेवाईकाचे मांस कोणी भक्षण करतो काय? हे तुझे ताट मासयुक्त पदार्थांनी भरलेले आहे. सारे पशुपक्षी आपले नातेवाईक आहेत त्यांना मारुन आपण आपले पोट भरावे का ? त्यांनी त्याला गुळपाणी मागीतले आणि आशीर्वाद देऊन निघाले.



वर्धमान गंगेच्या काठी आले त्यांनी नावेत इतर प्रवाशांबरोबर पैलतीरी जाण्यासाठी बसले. नाव मध्यभागी गेल्यावर आकाशात ढग जमा झाले, प्रचंड वारा सुटला लाटा नावेवर आपटून नाव डचमळू लागली. लोक भयभीत होऊन प्राणभयाने उभे राहिले, त्यामुळे नाव कलंडू लागली. वर्धमान मात्र एकटे शांत निर्भयपणे जागेवरच बसून होते. नावाड्याचे त्यांच्याकडे लक्ष गेले. त्याने सर्वप्रवाशांना वादळ संपेपर्यंत सन्यासी बुवासारखे शांत बसून रहा असे सांगीतले. त्यांनी वर्धमानकडे पाहिल्यावर त्यांना धीर आला. हळू हळू सर्व शांत झाले. नाव किनाऱ्याला लागल्यावर सर्व जण त्यांच्या पाया पडू लागले मात्र त्यांनी तसे करु दिले नाही.

वर्धमान राजगृहाहून विशाल नगरीत आले. त्याठिकाणी त्यांनी यंत्रशाळेत रहायचे ठरवले. कोपऱ्यात आसन मांडून डोळे मिटले. सकाळी मालक यंत्रशाळेत आला तेव्हा त्याला कोपऱ्यात एक नग्न साधू ध्यानात बसलेला दिसला. मालकाला वर्धमानचे हे रहाणे आवडले नाही. त्याने एक प्रचंड घण डोक्यावर मारण्यासाठी उचलला. पण तो मालक नुकताच आजारातून उठलेला असल्याने अशक्तपणामुळे त्याचा तोल गेला आणि घण त्याच्याच डोक्यावर पडला आणि मालक गतप्राण झाला. वर्धमानने मोठ्या दु:खाने म्हटले 'क्रोधाच्या आहारी गेल्याचा केवढा हा अनर्थ !'

वर्धमान महावीरांची भ्रमंती सुरु होऊन आता बारा वर्षे होत आली होती. शेवटचे सहा महिने ते लाट प्रदेशात होते. त्याठिकाणी त्यांना खूप त्रास सहन करावा लागला होता. ते उपाशीच होते. अशा अवस्थेत ते कोशांबी नगरीत शिरले. इथल्या लोकांना वर्धमानांबद्दल आदर होता. ते त्यांना भगवान मानत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या घरी अन्नग्रहण करुन उपवास सोडावा असे सर्वांना वाटत होते. वर्धमान मात्र सर्वत्र हिंडत होते. चौथ्या दिवशी ते गल्लीबोळातुन हिंडताना त्यांचे लक्ष एका मुलीकडे गेले तिचे साफ मुंडन करुन तिच्या पायांत लोखंडी बेड्या होत्या. ती दु:खी मुलगी उकडलेल्या उडदाचे दाणे खात होती. वर्धमान तिच्या जवळ आले आणि आपली ओंजळ पुढे केली. तिने त्यांच्या ओंजळीत आनंदाने उडदाचे दाणे टाकले. त्यांनी ते खावून उपवास सोडला. सर्व नगरवासीयांना आश्चर्य वाटले, की एका दासी कडून अन्न ग्रहण केले याचे. तिच्या मालकाने वर्धमान यांचे दर्शन घेऊन तीची सुटका केली. महावीरांनी सांगीतले की मी आज एका दु:खी जीवाकडून भिक्षा घ्यावयाचे ठरवले होते. मला योग्य भिक्षा मिळाली याचा मला आनंद आहे. त्याचवेळी राजा शतनिक आपल्या पत्नीसह येऊन महावीरांची माफी मागितली व सर्व दासींची मुक्तता केली.





त्यानंतर ते चंपानगरीत आले. त्याठिकाणी ते ऋतूकुला नदीच्या काठावर एका शालवृक्षाखाली वर्धमान ध्यानास बसले आणि समाधी लावली. काहीवेळाने दिवसाच्या चौथ्याप्रहरी केवलज्ञान आणि ते यांच्यातील असलेले अंतर नष्ट झाले. जैनांच्या भाषेत 'अरिहंत' पद प्राप्त झाले हा दिवस वैशाख शुक्ल दशमीचा होता.

वर्धमान आपापा(ला) नगरीत आले. तेथे सेमिल नावाच्या श्रीमंत ब्रामणाच्या घरी एक मोठा यज्ञ होणार होता. त्यासाठी त्याने अकरा विद्वान ब्रामणांना निमंत्रित केले होते. यज्ञात मोठ्याप्रमाणावर आहूतीसाठी पशु देणार होते. वर्धमानांनी धर्माच्या नावावर चाललेल्या हिंसेचा निषेध्र केला. परमेश्वर प्राप्तीसाठी शुध्द आचरण आणि संयम हा मार्ग ते दाखवू लागले. लोक त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकु लागले. यज्ञाचा प्रमुख इंद्रभूती वर्धमानकडे आला आणि त्याने आत्म्याबद्दलच्या शंका विचारल्या. त्याचे निरसन वर्धमानने केल्याने त्याने लगेच त्यांचे शिष्यत्व पत्करीले.

इंद्रभूतीचा भाऊ आला, त्याने कर्माबद्दल काही शंका विचारल्या त्याचे समाधान झाल्यावर त्याने सुध्दा शिष्यत्व पत्करीले. त्याचप्रमाणे यज्ञासाठी आलेले अकरा विद्वान ब्राम्हणांनी देखील शिष्यत्व पत्करीले. त्यावेळी वर्धमानांनी जो उपदेश केला तो त्यांचा पहिला उपदेश मानला जातो. ते म्हणाले ' या जगात सहा प्रकारचे जीव आहेत, त्या सर्वांना सुख हवे असते. म्हणून त्यांना काया, वाचा, मन अशा कोणत्याही प्रकारे दु:ख देऊ नये.'

त्यानंतर ते परत आपल्या वैशाली नगरीत आले आणि रोज प्रवचनातून लोकांना उपदेश देऊ लागले. त्यांची मुलगी चंदनबाला सह अनेक हजारो स्त्री पुरुषांनी नवधर्मात प्रवेश केला. प्रमुख गणधर इंद्रभूती यांनी सर्व शिष्यांचे मुनी, आर्यिक, श्रावक आणि श्राविका असे चार संध बनवले. मुनी आणि श्राविका म्हणजे सर्व सुखाचा त्याग करुन संन्यस्त जीवन जगणारे स्त्री- पुरुष. तर श्रावक आणि श्राविका म्हणजे गृहस्थाश्रमात राहून वर्धमानाच्या उपदेशाप्रमाणे जीवन जगणारे स्त्री पुरुष. या चार संघांना तीर्थ असे म्हणतात. तीर्थाची स्थापना करणारे वर्धमान म्हणून त्यांना 'तीर्थकार' म्हणतात. तसेच त्यांना देवपदावर पोहचलेले म्हणजे 'अहिरत' असे म्हणतात. जिन याचा अर्थ ज्याने इंद्रियावर जय मिळवला आहे असा, त्याचा जो धर्म तो जैन धर्म. वर्धमानची मुलगी प्रियदर्शनी व जावई जामली याने शिष्यत्व पत्करीले होते. पत्नी यशोदादेवी त्यांना भेटू शकली नाही कारण ती परलोकात गेली होती.

वर्धमानांना दिव्य ज्ञान प्राप्त झाल्याला तीस वर्ष लोटली. या काळात त्यांनी सर्वत्र हिंडून आपल्या विचाराचा प्रसार केला. हजारो शिष्य मिळवले. वयाच्या बहात्तर वर्षी पावापुरीचा हस्तिपाल राजाला शेवटचा उपदेश दिला की ' धर्म ही सांगयची गोष्ट नसून आचरणात आणायची गोष्ट आहे. मनुष्याने आपले नैतिक स्वातंत्र अबाधित राखावे.' नंतर अश्विनी अमावस्येला वर्धमानांनी आपल्या देहाचा त्याग केला. भगवान महावीरांनी लोकांना पाच महाव्रते सांगितली. त्यांना पंचशील असेही म्हणतात ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) अहिंसा : हे तत्त्व आचरणात आणण्याबाबत साधकाने आपल्या मनात असा विचार करावयाचा असतो की, मी प्राणिमात्राच्या हिंसेचा आयुष्यभर त्याग करीन. मी अहिंसा शरीराने, शब्दाने अथवा मनाने(विचारांनी) सुध्दा करणार नाही. दुसऱ्याला करु देणार नाही. मात्र तसे करताना मी अहिंसेनेच त्याच्याशी वागेन.

२) सत्य : साधकाने या तत्वाबद्दल असा विचार करावा की, मी नेहमी जे खरे असेल तेच बोलेन. खऱ्याचाच पक्ष घेईन. स्वत:च्या फायद्यासाठी कधीही असत्याचा आधार घेणार नाही. थट्टा, विनोद यांसाठी कधीही सत्य सोडणार नाही, सत्याचे पालन करताना कितीही त्रास झाला तरी तो मी आनंदाने सोशीन. दुसरा असत्याचरण करीत असेल तर त्याला त्यापासून दूर करण्याचा प्रयत्न करीन.

३) अस्तेय : हे तिसरे व्रत. साधकाने नेहमी विचार करावा की, मी आयुष्यात कधीही, कशाचीही चोरी करणार नाही मी कुठेही असलो तरी मला कोणी हाताने संतोषाने दिल्याशिवाय मी ते घेणार नाही.

४) ब्रह्मचर्य : शरीरसुखांचा उपभोग घेताना मी कोणतीही मर्यादा कधीच ओलांडणार नाही. मन चिंतनसुध्दा मी उपभोगरहित ठेवीन. माझ्या माया-इंद्रियांवर ताबा रहावा म्हणून मी आहारसुध्दा साधा व अगदी कमी घेईन.

५) असंग्रह : हे शेवटचे व्रत. याला परिग्रह असेही म्हणतात. या तत्त्वाचा अर्थ असा की, साधकाने स्वत:जवळ अनावश्यक वस्तूंचा, गोष्टींचा संग्रह करु नये. त्याने वस्त्र, जरुरीपुरते अन्न एवढेच घ्यावे. तसेच कोणाकडून मी काहीही मागून घेणार नाही, हे मनी बाळगावे.

ही पाच महाव्रते दिसायला जरी साधीसोपी वाटली तरी ती प्रत्यक्ष आचरणाला फार कठीण असतात. संन्याशांना ती शक्य आहेत पण सामान्य व्यवहारी, संसारी मानसांना शक्य नाहीत हे ध्यानात घेऊन जैन धर्मात सामान्य मानसांसाठी बारा अनुतत्वे सांगितली आहेत.

# सहज समाचार

- ## सहजयोगाची Epilepsy साठी उपयुक्तता :-

डिसेंबर १९९९ मध्यें हैद्राबाद येथें - नवीन सहस्रकामधील आरोग्य संवर्धन - या विषयावर Epileysy Association आणि Indian Epilepsy Society या संस्थांतर्फे एक परिषद आयोजित करण्यात आली होती. Defence Institute of Physiology and Allied Sciences (DIPAS) या संस्थेनें Epilepsy या आजारावर सहजयोगामधून व पारंपारिक औषधोपचार यांच्या संयुक्त उपचार-पध्दतीबाबत कांही संशोधनपुर्वक माहिती या परिषदेमधे पाठवली होती.

या परिषदेला सांप्रत राष्ट्रपति व त्यावेळचे संरक्षण विभाग प्रमुख सल्लागार श्री ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा संदेश आला होता. त्या संदेशामधें श्री अब्दुल कलाम यांनी असे म्हटले होते की, -'' DIPAS यां संस्थेनें केलेल्या संशोधनावरुन असें प्रमाणित होते की एपिलेप्सी या रोगावर पारंपारिक औषधांबरोबर सहजयोग केल्यास त्या रोगावर योग्य नियंत्रण प्राप्त होते. योग साधनेमुळे सिंपथेटिक संस्थेचे कार्य तणावमुक्त व संतुलित होण्यास मदत होते आणि मेंदू- सस्थेला विचार - प्रकिया मंद झाल्यामुळे आराम मिळतो सहा महिने नियमीतपणे सहजयोग केल्यावर व त्याचबरोबर औषधांचा कमी डोस ठेवल्यावर फीट येण्याची वारंवारता, त्याची तीव्रता आणि त्याचा काळ कमी झाल्याचे दिसून आले आहे. या रोगासाठी पारंपारिक औषधे दीर्घकाळ चालू राहिल्यास मेंदू- संस्थेवर दुष्परिणाम होऊं शकतात, म्हणजे कमीत -कमी औषधे वापरुन हा रोग नियंत्रित करणें फायद्याचे आहे.''

- ## गणपतीपुळे :-

गणपतीपुळे सेमिनार मध्ये येणाऱ्या सहजयोग्यांना समुद्रावर जाण्यासाठी आपला स्वत:चा कामयस्वरुपी रस्ता असावा म्हणून जमीन खरेदी पुणे सहजयोग केंद्रामार्फत केली. त्या जागेत विहीर काढली असता दहा फुटावरच गोड पाणी लागले. जुलै २००३ महिन्या अखेरीस त्या जागेचे भूमिपूजन होणार आहे.

- ## पुणे आश्रम :-

पुणे सहजयोग ध्यान मंदिरात पुढच्या बाजुला ढोलपुरी दगडाचा वापर करुन इमारतीच्या देखणे पणात भर घातली आहे. तसेच पहिल्या मजल्यावर सहजयोगाची पुस्तके व इतर साहित्य मिळण्यासाठी कायमस्वरुपी स्टॉल तयार केला आहे. तसेच फिल्टर पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच ध्यानाच्या हॉलच्या खांबांवर आकर्षक मूर्ति बसवून हॉलची शोभा वाढविली आहे.



विश्व निर्मला प्रेम आश्रम उद्घाटन सोहळा





# विश्व निर्मल प्रेम आश्रम उद्घाटन सोहळा







